ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

मार्च २००९ • मूल्य १० रुपये



## द क्युरियस केस ऑफ 'स्लमडॉग मिलीनेयर'

---

## आम्ही बुद्ध स्वीकारला असला तरी...









## कृतार्थ मुलाखतमालेत तबलामहर्षी भाई गायतोंडे

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**मार्च २००९**
**वर्ष २९ वे, अंक ३ रा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **धनंजय गांगल**

मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : संस्थांना १०० रु.**
**व्यक्तींना ६० रु.**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**
पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला,
टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर,
ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा,
बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स. न.

दहाव्या व्रिदोही मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष संजय पवार यांचे भाषण अंकात प्रसिद्ध केले आहे.

त्या आधी झालेले, बे एरियातले मराठी विश्व संमेलन जाहीर झाल्यापासून गाजत होते. ते पार पडले. या संमेलनाबद्दल अभय पाटील आणि अनंत ठकार यांनी आपल्या भूमिका मांडल्या आहेत.

एकूणच मानसिकता बदलून मानवीमूल्यांची नव्याने रुजवात करण्याची गरज सु.गो. तपस्वी यांनी, त्यांच्या नव्या पुस्तकात प्रतिपादन केली आहे. त्यासाठीच्या मूल्यशिक्षणाबद्दल त्यांनी परिसंवादांच्या अनुभावातून मांडलेले विचार 'विकासाची रूपरेषा–परिसंवादांच्या अनुभवातून–अर्थात तिसरा स्वातंत्र्यलढा' या पुस्तकात आहेत. पुस्तकाचे प्रकाशन पुण्यात झाले. त्याचा संक्षिप्त वृत्तांत पुस्तकाबद्दल जाण करून देईल.

ठाणे ग्रंथाली केंद्र नाविन्यपूर्ण उपक्रमाने वाचकदिन साजरा करते. या वर्षी विविध शाळांतील मुलांनी 'मुलाखत कशी घ्यावी?' या विषयावर सादरीकरण केले.

कृतार्थ मुलाखतमालेत तबलामहर्षी भाई गायतोंडे यांची मुलाखत संपन्न झाली. ती पुढील अंकी प्रसिद्ध करत आहोत.

वेगवेगळ्या पण सकारात्मक विचारांची पाठराखण करणाऱ्या भूमिकांनी सिद्ध झालेला अंक विचाराला खाद्य देणारा आहे.

**– संपादक**

## अनुक्रम


- **अध्यक्षीय भाषण –** संजय पवार / २
- **बे एरिया संमेलन –** अभय पाटील / अनंत ठकार / ९
- **अर्थकारण –** यशवंत अ. पंडितराव / १२
- **विशेष लेख –** राजीव जोशी / १६
- **स्लमडॉग मिलीनेयर –** धनंजय गांगल / १९
- **ठाणे वाचक दिन** / २३

## दहावे विद्रोही मराठी साहित्य संमेलन – कणकवली

# आम्ही बुद्ध स्वीकारला असला तरी...

### संजय पवार

कोकणातील जन्मलेल्या माझ्या सर्व मित्रमैत्रिणींनो!

कोकण हे विद्रोही परंपरेच्या इतिहासातील एक महत्त्वाचे स्थान आहे. ज्या कोकणस्थ ब्राह्मणांच्या पेशवाईत शूद्रांना अस्पृश्यतेचे अमानवी चटके सहन करावे लागले, त्या कोकणस्थ ब्राह्मणांच्या मूळ पुरुषाची– परशुरामाची ही भूमी! पण याच भूमीत अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचे एक महत्त्वाचे पर्व महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाने आणि मनुस्मृतीदहनाने सुरू झाले. त्यावेळी जे विद्रोहाचे पाणी पेटले ते आजही धगधगत ठेवणाऱ्या विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या, कणकवलीत भरत असलेल्या या दहाव्या विद्रोही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी, मी त्या पाण्याला साक्ष ठेवून, विनम्रपणे नव्हे, तर आजच्या भाषेत सांगायचं तर या 'हॉट सीट'वर मी जबाबदारीने बसतोय!

या कोकणाच्या भूमीने पेशवाईची सुस्त आणि मस्त परंपरा जशी जन्माला घातली, त्याचप्रमाणे पा.वा. काणे, महर्षी कर्वे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी तीन 'भारतरत्ने'ही जन्माला घातली.

तशी विद्रोहाची परंपरा चार्वाक, बुद्धापासूनची. ती खळाळत्या प्रवाहाप्रमाणे अखंड आहे. तो इतिहास तुम्हा आम्हाला आणि अभ्यासकांना माहीत आहे. त्यामुळे त्या इतिहासाची पुनरावृत्ती करण्यापेक्षा विद्रोही साहित्य संमेलनाची दहा वर्षांपूर्वीची सुरुवात आणि आजवरची वाटचाल याविषयी बोलणे मला महत्त्वाचे वाटते. १९९९ साली महाराष्ट्रात शिवसेना–भाजपा युतीचे सरकार असताना, अखिल भारतीय साहित्य संमेलनाने या सरकारची मदत घेऊ नये अशी आपल्या सर्वांबरोबरच अनेक प्रागतिक विचारांच्या साहित्यिक, विचारवंत, कलावंत यांची अपेक्षा होती. साधारण १९७२ पासूनच, जेव्हा दलित पँथरसारखी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक चळवळ महाराष्ट्रात सुरू झाली, तेव्हापासूनच सदाशिवपेठी साहित्य आणि ते प्रसवणारे सारस्वत व त्यांची संमेलने यांना विद्रोही भूकंपांचे धक्के बसू लागले. नामांतर आंदोलनाच्या काळात हे धक्के अधिक तीव्र झाले आणि काही ठिकाणी संमेलने उधळलीही गेली.

त्यानंतर १९७६ च्या आणीबाणीनंतर या सारस्वतांतच बंडखोरी झाली. दुर्गा भागवतांनी, यशवंतराव चव्हाणांना खडे बोल सुनावल्याची आठवण आजही टिळकांच्या 'मी शेंगा खाल्ल्या नाहीत, मी नाव सांगणार नाही' अशा बाणेदार वाक्यासारखी सांगितली जाते. त्यानंतर १९८० साली, अंतुले मुख्यमंत्री असताना चौफेर पत्रकार माधवराव गडकरींच्या पुढाकाराने मुंबईत मालतीबाई बेडेकरांच्या अध्यक्षतेखाली, राजकारण्यांना मंडपाबाहेर ठेवून समांतर साहित्य संमेलन भरले. पण या साऱ्या तात्कालिक बंडखोऱ्या ठरल्या. कारण या दोन्ही घटनांत सहभागी असलेले, पुढाकार घेतलेले जवळपास सर्वचजण 'स्वगृही' परतले आणि निव्वळ राजकारण्यांच्याच स्वागताध्यक्षपदाखाली झालेल्या संमेलनात उत्साहाने सामील होत शाल–श्रीफळ घेऊन धन्यही झाले.

तरीही आधीचा इतिहास आठवून देत, शिवसेना–भाजपा या पक्षांचे राजकीय चारित्र्य आणि संस्कृती ही पुनरुज्जीवनवादी, सांस्कृतिक मनगटशाहीची आहे याची जाणीव करून देत, अशा सरकारकडून मदत घेऊ नये अथवा त्यांना या संमेलनात येऊ देऊ नये अशी रास्त मागणी केली गेली. परंतु सारस्वतांनी ती मानली नाही आणि ठिणगी पडली.

त्या अर्थाने मुळातच प्रातिनिधिक नसणाऱ्या अखिल भारतीय मराठी संमेलनावर बहिष्कार टाकून पर्यायी संमेलन भरवण्याचा निर्णय झाला. मुख्य संमेलना–विषयी इतकी नाराजी सर्वत्र होती, की बहिष्काराच्या निर्णयानंतर दोन पर्यायी संमेलने झाली– एक 'विद्रोही', दुसरे 'सकल'. सकल संमेलनाला त्या वर्षापुरताच प्रतिसाद मिळाला किंवा त्यांनी तो विरोध त्या वर्षापुरताच मर्यादित ठेवला. विद्रोही साहित्य संमेलन मात्र पहिल्या वर्षी धारावीत उत्साहात पार पडल्यानंतर कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, नंदूरबार, मनमाड, वाशी (नवी मुंबई), धुळे, सोलापूर आणि आज दहाव्या वर्षी कणकवलीत होत आहे. याचा अर्थ असा आहे, की दहा वर्षांपूर्वी जो पर्याय उभा केला, तो आजही दिमाखात उभा आहे. तोतयांच्या बंडासारखा, एक–दोन उड्यांत संपलेला नाही आणि मला विश्वास आहे की मराठीच नव्हे तर भारतीय साहित्याच्या इतिहासात या संमेलनाची

दखल घ्यावीच लागेल.

मित्र-मैत्रिणींनो आता दहाव्या वर्षात पदार्पण करताना, आपण विद्रोही साहित्य संमेलन, हे अखिल भारतीय संमेलनावरची निव्वळ प्रतिक्रिया, पर्याय किंवा समांतर साहित्य संमेलन नव्हे तर दलित-आदिवासी, ग्रामीण आणि स्त्रिया यांचे स्वतंत्र सार्वभौम संमेलन अशी त्याची ओळख करून देउया! आता तुलनाच काय गणनाही नको. कारण आपल्याला अभिप्रेत संमेलनच काय; जे साहित्यही नाही, त्याची दखल तरी का घ्या? बाबासाहेबांनी जशी घोषणा केली होती, की 'मी हिंदू धर्मात जन्मलो असलो तरी हिंदू धर्मात मरणार नाही!' त्याच पद्धतीने आपण म्हणूया, 'मी मराठी साहित्य लिहीत असलो, तरी मी तथाकथित अ.भा. संमेलनात जाणार नाही!' न्या. रानडे यांचे वारसदार निमंत्रण पाठवत राहिले तरी महात्मा फुले यांच्या वारसदारांनी घालमोड दादांना ठाम नकारच कळवायला हवा! जर-तरच्या भाषेला विद्रोहात स्थान नसते. कावा मर्यादित अवकाशात पेटत नाही.

विद्रोही साहित्य किंवा विद्रोही साहित्य संमेलनाबद्दल जनसामान्यांमध्ये म्हणजे पांढरपेशा वाचकांमध्ये काही ठाम कल्पना आहेत. विद्रोही साहित्य म्हणजे काहीतरी भडक, शिवराळ, देवा-धर्मावर विशेषत: हिंदू धर्मावर टीका करणारे, अश्रद्ध, नास्तिक लोकांचे किंवा बॅकवर्ड क्लास दलित वगैरे लोकांचे साहित्य; अशा सगळ्या नकारात्मक प्रतिक्रिया, समज-गैरसमज आहेत. परंतु हे सर्व असे का? किंवा ते वाचून जाणून घेण्याचा प्रयत्न, काही अपवाद सोडता, बहुसंख्येने होताना दिसत नाही. उलट आता जळी-स्थळी सगळीकडेच आरक्षण ठेवायचे का? असा कुचेष्टेचा सूर दिसतो.

मला त्या सर्व पांढरपेशा वर्गाला सांगायचेय, की तुम्ही शाळेत गेलात. अभ्यासक्रमात जे जे आले ते वाचलेत, अवांतर वाचनही केलेत. पण ते जे काही केलेत, ते गेल्या वीच-पंचवीस वर्षांपर्यंत साडेतीन टक्क्यांचेच साहित्य होते. फडके, खांडेकरांना 'कालबाह्य' ठरवले ते आम्ही नाही तुम्हीच! केशवसूत आणि मर्ढेकरांना क्रांतिदूत तुम्हीच ठरवलेत. याचा अर्थ असा होतो, मराठी साहित्य हे त्या त्या काळात कालबाह्य ठरत गेले. ते कालबाह्य का ठरत गेले? तर चातुर्वर्ण्यात शिक्षणाचा अधिकार फक्त त्रिवर्णांनाच होता. शूद्र, ज्यात स्त्रियाही आल्या, यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. याचा अर्थ पन्नास टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शिक्षणापासून वंचितच होती. 'क्षत्रिय आणि वैश्य' हे आपल्या वर्णाच्या कर्माप्रमाणेच स्पेशलाईज्ड् कोर्स करत होते! त्यामुळे साहित्य वगैरे प्रकार सगळा ब्राह्मणांच्या हातात. त्यात संस्कृत ही देवांची भाषा करून ठेवलेली. 'ज्ञान दिल्याने वाढते' वगैरे सुभाषिते लिहून यांनीच कुणालाही ज्ञान दिले नाही त्या काळात! या प्रभावामुळेच पुढे द्रोणाचार्यांनी एकलव्याकडून अंगठा मागणे ही कॅपिटेशन फीपेक्षा भयंकर 'गुरुदक्षिणा' होती. सगळ्या जगण्यावर 'ब्राह्मण्यांचे' नियंत्रण होते. ब्राह्मणी व्यवस्थेने सोवळे-ओवळे फक्त धर्मापुरते मर्यादित ठेवले नाही. त्यांनी दैनंदिन जीवनापासून पुढे साहित्य आणि कला प्रकारांतही आणले. पुन्हा ते स्वत:च स्वत:चे ब्रॅण्ड ॲम्बॅसिडर होते आणि त्यांची कॅचलाईनही गमतीशीर होती, 'कितीही झाला भ्रष्ट तरीही ब्राह्मण तिन्ही लोकी श्रेष्ठ!' आणि सर्वश्रेष्ठत्वाच्या ब्राह्मण्यत्वाच्या अहंगंडापुढे त्यांनी जिला 'धर्मपत्नी', माता, भगिनी अशा उपाध्या दिल्या, त्या ब्राह्मण स्त्रीलाही त्यांनी पापयोनी समजले, दासी म्हटले. बालविवाह करून, कोवळ्या विधवांचे लैंगिक शोषण आणि केशवपन असे विकृतीकरण केले. या सगळ्यांचे चित्रण, याबद्दलचा विरोध आणि सुधारणा ब्राह्मण पुरुषांनीच केल्या. पण ते खंडन-मंडनाच्या परंपरेतले झाले. याला सक्रिय विरोध महात्मा फुलेंनी केला. त्यांनी विधवांचे गर्भपात,

**आजच्या ब्राह्मण व इतर स्त्रियाही वीणावादक सरस्वतीला विद्येची देवता मानतात. त्यांनी लक्षात ठेवावे, की ज्यावेळी तुम्हाला शिक्षणाचा अधिकारच नाकारला होता तेव्हा ही सरस्वती, पॅड लावून पॅव्हेलियनमध्ये बसलेल्या बाराव्या खेळाडू-सारखी, फोटोत नुसती बसून होती मोरावर! तेव्हा तुम्हाला ज्ञान सरस्वतीने नाही, सावित्रीबाई फुलेंनी दिलेय याची जाणीव ठेवा.**

बाळंतपण तर केलीच. पण केशवपना विरोधात न्हाव्यांचा संप घडवून आणला. आपल्या व्यवसायातून, समाज-सुधारणा घडावी म्हणून कष्टकरी समाजाने केलेला जगातला हा पहिला आणि एकमेव संप असावा! महात्मा फुले आणि सावित्री फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी पुढाकार घेतला. त्यासाठी शेणगोळे आणि दगड खाल्ले, पण स्त्रीशिक्षणाची वाट मोकळी केली. आजच्या ब्राह्मण व इतर स्त्रियाही वीणावादक सरस्वतीला विद्येची देवता मानतात. त्यांनी लक्षात ठेवावे, की ज्यावेळी तुम्हाला शिक्षणाचा अधिकारच नाकारला होता तेव्हा ही सरस्वती, पॅड लावून पॅव्हेलियनमध्ये बसलेल्या बाराव्या खेळाडू-सारखी, फोटोत नुसती बसून होती मोरावर! तेव्हा तुम्हाला ज्ञान सरस्वतीने नाही, सावित्रीबाई फुलेंनी दिलेय याची जाणीव ठेवा. कर्वे, आगरकर, गोखले वगैरे सगळे नंतरचे! त्यांचे कतृत्व थोरच आहे पण आपल्या जातीचे म्हणून त्यांनाच आद्य सुधारक समजू नका! अशाप्रकारे महात्मा फुले आणि सावित्री फुले यांचे कार्य, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील,

अण्णासाहेब शिंदे यांनी ब्राह्मण-भटशाहीला आव्हान देत शिक्षणाची दारे बहुजन समाजासकट सर्व दलित, आदिवासी, भटके यांच्यासाठी खुली केली. मधल्या काळात संतांनी, ब्राह्मण्याला विरोध करत भागवत-धर्माची पताका फडकावली. आज तोच भगवा ध्वज ब्राह्मणी हिंदुत्वाच्या दावणीला बांधलेला बघून ज्ञानोबा, तुकारामांचे आत्मे तर तडफडत असतीलच पण प्रबोधनकार ठाकरेही अस्वस्थ असतील.

या सगळ्यांनी 'ज्ञानाची कवाडे' सर्वांसाठी खुली केली हा सगळा वर्ग, स्त्रियांसह लिहू, वाचू, बोलू लागला तसे मराठी साहित्याचे चित्र बदलत गेले. सुरुवातीला ग्रामीण साहित्य, मग दलित, आदिवासी, भटक्यांचे साहित्य आले आणि काचेच्या फुलदाणीतल्या प्लॅस्टिक फुलांसारखे असलेले मराठी साहित्य एखादे माळरान रानफुलांनी सजीव व्हावे तसे सजीव झाले! शब्दांचे फुलोरे आणि कलाबुती कालबाह्य झाल्या आणि माणसाचे जगणे आणि लिहिणे यातले अंतर संपले. मराठी साहित्यावरचा ब्राह्मणी ठसा पुसला गेला आणि ते मराठी मुलुखाचे साहित्य झाले. ब्राह्मणी साहित्य हे केवळ साहित्य नव्हते तर ते ब्राह्मणी संस्कृतीचा जी पितृसत्ताक, पुरुषप्रधान आणि विषमतावादी, वर्ण-वर्चस्ववादी होती तिचा प्रचार आणि प्रसार करणारे होते. त्यामुळे त्या साहित्याला विरोध हा केवळ साहित्यिक विरोध नव्हता तर तो सामाजिक, सांस्कृतिक विरोधही होता. अनेकांना हा विरोध 'ब्राह्मण'व्यक्ति-विरोधात, जातीविरोधात वाटतो, पण म. फुल्यांपासून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरां-पर्यंत ते आताच्या सर्व प्रागतिक चळवळी हेच सांगत आल्यात की विरोध ब्राह्मणांना नसून, ब्राह्मण्याला आहे आणि ब्राह्मण्य ही एक नीती आहे. ब्राह्मणेतर चळवळीचा टोकाचा 'ब्राह्मण'विरोध म्हणूनच डॉ. बाबासाहेबांनी स्वीकारला नाही. कारण बाबासाहेबांच्या चळवळीत किंवा त्याआधीही अनेक ब्राह्मणांनीही ब्राह्मण्यां-विरुद्ध विद्रोह केला. चवदार तळ्यावर आणि मनुस्मृती जाळताना ब्राह्मण सोबत होते. पण ते ब्राह्मण्य नाकारलेले होते. आता हे ब्राह्मण्य म्हणजे नेमकी काय भानगड असते आणि ते भल्याभल्यांची वाट लावते याचे आद्य उदाहरण म्हणजे वाल्याकोळी. तो पुढे वाल्मिकी झाला आणि त्याने रामायण लिहिले.

वाल्या कोळी होता तेव्हा तो वाटमाऱ्या करून पोट भरायचा. आता तो कोळी असून मासेमारी न करता वाटमाऱ्या का करायचा कळत नाही! कदाचित तेव्हाही एसईझेडमुळे बिचाऱ्याचा रोजगार गेला असेल! तर त्याला त्यावेळच्या कुणी अण्णा हजारेंनी नैतिक प्रश्न विचारले आणि हा गडबडला! बायका-पोरे संघवाल्यांसारखी नैतिक जबाबदारी झटकून मोकळी झाली. मग त्याने तपबिप केले. म्हणजे ज्ञान प्राप्त केले. त्या काळात ज्ञान प्राप्त करणे म्हणजे ब्राह्मण्य मिळवणे! आणि जसा तो वाल्मिकी झाला, त्याने रामायणात बायको, पोरांवर सूड उगवला! दशरथाला चार बायका दिल्या! पण त्याच्या मुलाला मर्यादापुरुषोत्तम केले. लक्ष्मणाला लग्न करूनही ब्रह्मचर्य वाट्याला आले आणि सीतेला वनवास. नंतर धोब्याने संशय घेणे आणि लवकुशांना बाप न मिळणे हा सगळा पुरुषप्रधान कलाविष्कार म्हणजे ब्राह्मणांचा पुरावाच! ब्राह्मण्य माणसाला बिघडवते ते असे! बरे अंतर्विरोध किती? यांचा वाक्प्रचार 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर!' आणि आधुनिक वाल्मिकी माडगूळकर लिहितात, 'स्वये श्री प्रभू रामचंद्र ऐकती कुशलव रामायण गाती.' हे ज्याच्यासमोर ज्यांची स्तुती करतोय, तोच आपला बाप आहे हा वाल्मिकीचा फॉर्म्युला पुढे हिंदी सिनेमांनी वापरून खोऱ्याने पैसा जमा केला! म्हणजे वाल्याला वाटमारी करून जेवढे पैसे मिळाले नाहीत, त्याच्यापेक्षा कितीतरी पट रामायणाची रॉयल्टी म्हणून वाल्मिकीला मिळाली असेल! कारण ती ब्राह्मणमान्य, ब्राह्मण्य पावलेली! उगाच नाही आपले आवडते य.दि. फडके, यादव, मेश्राम आणि पानतावणे तिकडे जाऊन वाल्याचे वाल्मिकी होत!

मित्रमैत्रिणींनो! ज्यांना शतकांपूर्वी शिक्षण घेण्यासाठी 'ब्राह्मण्याचा व्हिसा' लागत होता, त्यांचा व्हिसा काढून भांडवल-दारी देशात नेऊन आता विश्वात्मके देवे म्हणायची चढाओढ सुरू झाली आहे. पाकिस्तान भारतात दहशतवादी हल्ले करवते, करते असे म्हणून पाकडे, हिरवी अवलाद म्हणून इथे गळे काढायचे. पण या पाकिस्तानला सर्वंकष मदत देऊन पोसणाऱ्या अमेरिकेविरुद्ध 'ब्र' काढायचा नाही. उलट, तिथे जाऊन संमेलने आणि करमणुकीचे कार्यक्रम करून डॉलरमध्ये कमाई करायची. तिथे जाण्यासाठी रांगा लावायच्या. कधी काळी ब्रिटिशांविरुद्ध देशात आंदोलने झाली तेव्हा अनेक भारतीय विद्यार्थी ब्रिटन सोडून भारतात परतले. तसे पाकिस्तानविरुद्ध दबाव वाढवण्यासाठी अमेरिकास्थित मंडळी भारतात परततील? उलट, ९/११ झाल्यावर अमेरिकनांमधला वर्णभेदीपणा कसा दिसला, आशियाई लोकांना ते कसे तोंडावर शिव्या घालतात, टोमणे मारतात यावर इथल्या पेपरात गहिवरून लेख लिहिले! पण तेव्हा हे नाही आठवत, की भारतात सोवळी नेसून आपण हेच करत होतो, अजूनही केले जातेय. परदेशात जाऊन यांनी भंगीकाम केले की हे म्हणणार तिथे श्रमसंस्कृती आहे. कुणालाही अशी कामे करणे हे कमीपणाचे वाटत नाही. पण भारतात आले की, मात्र सफाई कामगार 'मागास जातीचाच' लागतो! या अशा दुटप्पी, दांभिक जातीयवादाविरुद्धच तर आपण सर्वंकष लढा उभारला आहे. त्यासाठी समविचारी पक्ष, संघटना, व्यक्ती यांची मिळून ही विद्रोही सांस्कृतिक चळवळ उभी केलीय. या चळवळीला आता दहा वर्षे झालीत. पण परंपरा दीडशे वर्षांहून अधिक वर्षांची आहे. आता पुढे जाण्याआधी, थोडे मागे वळून पाहणे आणि सदाशिवपेठी

साहित्य आणि साहित्य संमेलने यावर प्रतिक्रिया देण्यात, हल्ले करण्यात वेळ घालवण्यापेक्षा, आपण आपली चळवळ, आपले साहित्य, कला आणि त्यांचा विकास यावर गंभीरपणे चर्चा सुरू करायला हवी आणि त्यादृष्टीने व्यापक आणि दीर्घ मुदतीचा कार्यक्रम हाती घ्यायला हवा.

विद्रोही साहित्य संमेलन, हे विविध राजकीय, सामाजिक पक्ष, गट, संघटना ज्या परिवर्तनवादी, पर्यावरणवादी, स्त्री जाती-अंताचा लढा देणाऱ्या, भांडवली सत्तेला विरोध करणाऱ्या, डाव्या विचारांच्या संघटना आहेत. धोरणात्मक पातळीवर यातील अनेक लोकांचे, अनेक गोष्टींवर मतभेद आहेत. मतभेद हे वैचारिक जागरूकतेचे लक्षण मानत आणि अनेकदा मतैक्यापेक्षा मतभेदावरच अधिक चर्चा करत बसलो. त्यातून दोन वेगळी विद्रोही संमेलनेही भरवली गेली. एकीकरणाचे प्रयोग झाले, होताहेत. त्यांच्या तपशिलात मी जात नाही. परंतु माझे असे मत आहे, की या साहित्य संमेलनाचा कॅनव्हास जरी राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक असा व्यापक असला तरी विद्रोही साहित्य संमेलनात सर्वाधिक वेळ हा साहित्य व कला यावर दिला पाहिजे. कदाचित काहींना हा विचार कलावादी वाटेल. पण मला विश्वास आहे, की माझ्यासारखा एका जाणिवेने या क्षेत्रात कार्यरत असलेला कार्यकर्ता निव्वळ कलावादी विचार करणार नाही. आज या संमेलनाला उपस्थित असलेल्या आणि नसलेल्या पण या विचारांकडे आकर्षित झालेल्या अनेक तरुण-तरुणींना लिहायचे आहे. नाटक लिहून सादर करायचे आहे. चित्रपट काढायचाय. त्यांना आपण जो विचार मांडतो, त्या विचाराने साहित्य आणि कलाक्षेत्रांत काहीतरी करायचेय. अशा आपल्या तरुण मित्र-मैत्रिणींना या विचार-पीठावरून काही कार्यक्रम देता आला तर ही चळवळ आणखी फोफावेल. आकडेवारी सांगते की देशात आज वीस ते तीस वयाची पिढी सर्वाधिक आहे. संपूर्ण देशातच जी इंडिया विरुद्ध भारत अशी विभागणी झालीय, ती या पिढीत तर सर्वाधिक आहे. त्यामुळे या पिढीकडे लक्ष देणे अधिक गरजेचे आहे. त्यादृष्टीने मी जो काही विचार केलाय, तो आपल्यापुढे मांडतो. त्यावर सकारात्मक चर्चा व्हावी अशी अपेक्षा आहे.

विद्रोही सांस्कृतिक चळवळीतर्फे साहित्य आणि कला, माध्यम यांवर काम करणाऱ्या शिखर संस्थेची स्थापना करावी, ज्याचा उद्देश लोकपरंपरा, लोकसाहित्य, लोककला यांचे जतन, संवर्धन आणि त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञान, माध्यम यांचा लोक चळवळीसाठी, प्रबोधनासाठी आणि मुख्यत्वे दलित, ग्रामीण, आदिवासी, भटके यातील तरुणांना, कलाकार, साहित्यिक यांना एक अर्थार्जनासहितचे कार्यक्षेत्र निर्माण करणे हा असेल. त्याचप्रमाणे प्रस्थापित माध्यमात नैपुण्यासह जाऊन रोजगार अथवा कलाविष्कारासाठी मार्ग-दर्शनपर कार्यशाळा या शिखरसंस्थेने आयोजित कराव्यात.

आज घडीला राज्य आणि केंद्र शासनातर्फे यासाठी विविध मंत्रालये, स्वायत्त संस्था यांमार्फत शिष्यवृत्ती, पाठ्यवृत्ती, अभ्यासवृत्ती आणि इमारत निधीसह, कार्यक्रम राबवण्यासाठी निधी प्रतिवर्षी उपलब्ध होऊ शकतो.

शासनातर्फे निवृत्त, वयोवृद्ध कला-कारांना पेन्शन मिळते, त्यात अनेक पारंपरिक लोक कलाकार आहेत. त्या पेन्शन संदर्भात अथवा कलापथकांना देश-विदेशांत लोककलांचे कार्यक्रम सादर करण्याची संधी मिळते. तिथे ठरावीक मंडळींपेक्षा वेगळ्या लोकांनाही संधी मिळेल यासाठी प्रयत्न करता येतील.

शासनातर्फे कलाकार, साहित्यिक, पत्रकार यांना देण्यात येणाऱ्या घरांमध्ये गरजू, निराधार लोकांसाठी आग्रह धरायला हवा. शासकीय योजना म्हणून दुर्लक्ष करू नये. अन्यथा विठाबाईसारखी वेळ असंख्य लोकांवर येईल.

विद्रोही साहित्य संमेलन दरवर्षी न भरवता, तीन वर्षांतून एकदा भरवावे. मधल्या दोन वर्षांत, सुचवलेल्या शिखरसंस्थेने विविध अभ्यासवर्ग, कार्यशाळा आणि प्रत्यक्ष निर्मिती यावर भर द्यावा. विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे एक मासिक मुखपत्र असावे जे साहित्य, कला आणि माध्यम यांना वाहिलेले असेल.

याचबरोबर साडेतीन टक्क्यांचे साहित्य, संस्कृती, परंपरा नाकारताना, ठरलेल्या साडेशहाण्णव टक्क्यांची साहित्य, संस्कृती, परंपरा या संदर्भात भूमिका कोणती यावर गांभीर्याने चर्चा होऊन, ती लिखित स्वरूपात मांडली जायला हवी. आपण जर सदाशिवपेठी समीक्षा, सौंदर्यशास्त्र, आकृतिबंध नाकारणार असू तर विद्रोही विचाराची समीक्षा, सौंदर्यशास्त्र, आकृतिबंध यावर विचार आणि कृती व्हावी.

नाटक, दूरचित्रवाणी आणि चित्रपट या माध्यमांत आज बहुजन, दलित, ग्रामीण समाजातील अनेक लोक वर्षानुवर्षे काम करताहेत. त्यातले आज काही यशाच्या शिखरावर आहेत. अशा कलाकार, तंत्रज्ञांना घेऊन, नाटक, दूरदर्शन मालिका आणि चित्रपट निर्मिती व्हायला हवी. दलित रंगभूमी किंवा इप्टा यांसारख्या संस्थांनी आज पुन्हा एकदा कार्यरत होण्याची गरज आहे. बोधी नाट्य चळवळ आज नवीन नाटककार शोधण्याचे काम करतेय. इथे मला आणखी एक मुद्दा मांडावासा वाटतो. गेली काही वर्षे 'दलित' या शब्दाबद्दल वेगळी चर्चा सुरू आहे. त्याऐवजी फुले-आंबेडकरवादी, आंबेडकरवादी बौद्ध, बोधी असे अनेक पर्याय आग्रहाने पुढे आलेत आणि त्यावर हिरिरीने, प्रसंगी हमरीतुमरीवर येऊन वाद होतात. संस्था दुभंगतात, व्यक्तिद्वेष वाढता-हेत. एकेकाळी आपण सगळेच 'बहिष्कृत' होतो हे विसरून आपण एकमेकांना 'बहिष्कृत' करण्यासाठी शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या नीतीने प्रसंगी जातीयवादी,

धर्मांध व भांडवली पक्षसंघटना यांच्या दावणीला स्वत:सह आपला समाज, विचार आणि पूर्वसूरींनाही बांधून टाकतो. आपला नेमका शत्रू कोण हे ओळखून आपण आपल्यातले मतभेद कमीतकमी होतील हे पाहिले पाहिजे अथवा समूळ गाडले पाहिजेत. वैयक्तिक मोह, लाभ यासाठी विचारसरणीचा बळी जाऊ नये.

कुठल्याही चळवळीतील कार्यकर्त्याचे सार्वजनिक आणि वैयक्तिक चारित्र्य हे पारदर्शी आणि स्वच्छ असावे. पण चळवळ म्हणजे फक्त एखादा प्रश्न, विषय नव्हे आणि कार्यकर्ता म्हणजे त्या विशिष्ट प्रश्नावर पूर्णवेळ प्रत्यक्ष काम करणारी व्यक्ती एवढीच व्याख्या नसावी. विद्रोही प्रागतिक विचार मानणारा प्रत्येक स्त्री-पुरुष कुठल्याही क्षेत्रांत असोत, ते प्रश्नावर काम करणाऱ्या संघटना, गट, पक्ष यांचे सभासद असोत-नसोत, त्यांच्या सार्वजनिक व व्यक्तिगत जीवनात त्या विचारांचे प्रतिबिंब दिसले पाहिजे. नाहीतर आंतरजातीय लग्न करायचे आणि पुन्हा नवऱ्याच्या जातीसकट, त्याचे नवरेपण बायकोवर लादायचे आणि दलित कार्यकर्त्यांनी खुलेआम दारू पीत बाबा-साहेबांच्या नावाने 'जय भीम' म्हणायचे. पण दलित लेखक-लेखिकांनी एखाद्या दलित स्त्रीला दारू पिताना दाखवले की आपण लगेच त्याचा निषेध करायचा.

सावित्रीबाई फुले यांची स्त्री शिक्षणाची सुरुवात, किंवा मनुस्मृतीचे दहन हा खरा भारतीय स्त्री मुक्ती दिन, हा आग्रह यथार्थच आहे. परंतु जगभरातल्या स्त्री चळवळींनी, इथल्या उच्चवर्णीय स्त्रिया काही समतावादी, लिंगभाव, जातीयवाद, धर्मांधता, पर्यावरण या संदर्भात काही भूमिका घेत असतील तर त्यांना उच्चवर्णीय, वर्गीय शिक्के मारून बेजार करण्यापेक्षा, त्यांच्या माध्यमातून उच्चवर्णीय, वर्गीय स्त्रियांना सी.डी. देशमुखांप्रमाणेच किंबहुना त्यापेक्षा समस्त स्त्रियांच्या दृष्टीने अधिक बाणेदार असा हिंदू कोड बिलासंदर्भातला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राजीनामा आहे हे सांगितले पाहिजे. आज समान नागरी कायद्याच्या नावाने सोयीची बोंब करणारे जे आहेत, त्यांच्या पूर्वजांनी हिंदू विवाह कायदा, दत्तक, घटस्फोट, मालमत्ता यात घटनात्मक हस्तक्षेप नको असा आग्रह धरला होता.

आज 'लैंगिक स्वातंत्र्या'पर्यंत पोचलेल्या उच्चवर्णीय, वर्गीय स्त्रियांच्या चळवळीने हे लक्षात ठेवले पाहिजे की आज लग्नसंस्था, कुटुंबसंस्था, मालमत्ता हक्क यावर जो अधिकार तुम्ही सांगता, अथवा त्याची जी चिकित्सा करता तो करण्याचा घटनात्मक अधिकार केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे मिळालाय. 'अस्पृश्यांचे नेते' म्हणूनच बाबासाहेबांकडे बघणाऱ्या समस्त हिंदू स्त्रियांनी, तेहेतीस कोटी देव पुजण्याआधी बाबासाहेबांना वंदन करायला हवे! ब्राह्मणी मानसिकता मागच्याच आठवड्यात पुण्यात भरलेल्या ब्राह्मण अधिवेशनाने दाखवून दिलीय. एकविसाव्या शतकात मनुवादी मानसिकता बाळगणारी ही जमात सुधारणार कधी? आज ब्राह्मण ज्या पद्धतीने आपल्या जातीतील स्त्रियांना गुलाम बनवू पाहताहेत, त्याच-पद्धतीने दलित, आदिवासी, भटकेही आपल्या स्त्रियांना गुलामच समजतात का? आजही दारू पिऊन बायकोला मारायचे आणि जाब विचारला की म्हणायचे बायकोला मारणे ही आमची बहुजनांची परंपरा आहे! खैरलांजीसारख्या घटनेत पोलीस, डॉक्टर हे याच समाजातले असूनही अत्याचार करणाऱ्यांच्या बाजूने राहिले. भोतमांगेच्या पत्नीच्या चारित्र्याचे पोस्टमार्टेम करण्यात आले. चारित्र्यहीन माणसावर जमावाने हल्ला करण्याचा परवाना कुणी दिला? प्रश्न असा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अनुयायी आज एकविसाव्या शतकात योनीशूचिता आणि त्यावर आधारित पावित्र्याच्या संकल्पना स्वीकारणार का? मग मनू आणि आमच्यात फरक काय? बुद्ध आणि बाबासाहेब या दोघांनीही बजावले होते, माझ्यामागे आंधळेपणाने येऊ नका. बुद्धिप्रामाण्यवाद आणि विज्ञाननिष्ठा हे दोघांच्याही विचारांचे मूलाधार आहेत. त्याचा अंगीकार करून आपण हा परिवर्तनवादी विचार परिवर्तनाच्या आवर्तनात ठेवला नाही तर बुद्ध आणि बाबासाहेबांच्या विचारांचे केवळ मठ उभे राहतील. गौतम बुद्ध आणि बाबासाहेब यांच्या तसबिरी अथवा मूर्तीसमोर मेणबत्त्या पेटवून चालणार नाहीत, त्या आपल्या अंतर्यामी पेटवून 'अत्त दीप भव'चा संदेश अंगीकारावा लागणार आहे. स्वातंत्र्याला आणि धर्मांतरालाही पन्नास वर्षं झाल्यानंतर तरी आपण हा विचार करणार की नाही?

मित्रमैत्रिणींनो, विसावे शतक संपताच

**एकेकाळी आपण सगळेच 'बहिष्कृत' होतो हे विसरून आपण एकमेकांना 'बहिष्कृत' करण्यासाठी शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या नीतीने प्रसंगी जातीयवादी, धर्मांध व भांडवली पक्षसंघटना यांच्या दावणीला स्वत:सह आपला समाज, विचार आणि पूर्वसूरींनाही बांधून टाकतो. आपला नेमका शत्रू कोण हे ओळखून आपण आपल्यातले मतभेद कमीतकमी होतील हे पाहिले पाहिजे अथवा समूळ गाडले पाहिजेत. वैयक्तिक मोह, लाभ यासाठी विचारसरणीचा बळी जाऊ नये.**




**संमेलनात ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या संजय पवार यांच्या 'पानीकम' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत झाले**

वेगाने सर्व जगात आणि देशांत अनेक बदल होत आहेत. मुक्त अर्थव्यवस्थेचे गोडवे गाण्यास सुरुवात होत नाहीत तोच त्याचे तोटे दिसू लागलेत. खाजगीकरणाने कामगार आणि मध्यमवर्ग संपवून टाकला, मुक्त बाजारपेठांनी पारंपरिक लघुउद्योग, हस्तकला व इतर कुटिरोद्योग संपवले. ग्राहकवादाने 'गरजा' वाढवल्या आणि त्यासाठी क्रेडिट कार्ड, पर्सनल लोन यासारखी जाळी पसरवून, त्यातून नवी सावकारी जन्माला घातली. पुरुषप्रधान व्यवस्थेत 'दासी, उपभोग्य वस्तू' असलेली स्त्री नव्या बाजारपेठेत 'मल्टीपर्पज' वस्तूसारखी विविध रूपांत, रंगांत, आकारांत, स्वस्त किंतमीला आणि मुबलक उपलब्ध झाली. विनिमयामध्ये लेदर करन्सीलाही मान्यता लाभली. 'तळातला माणूस केंद्रस्थानी हवा' हे लोकशाही राज्यव्यवस्थेतले मूलगामी तत्त्व. पण राज्यकर्त्यांनी तळातला माणूस गाळात कसा जाईल हे स्थानिक उद्योगपती आणि बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्या संगनमताने अतिशय निर्दयपणे पाहिले आणि हे करताना देशाच्या निसर्ग संपत्तीचा, शेतकऱ्यांच्या जमिनींचा, स्थानिक फळे, फुले, पिके, जनावरे, त्यावर आधारित रोजगार हे एखादा बुलडोझर फिरवावे तसे फिरवले! सरकार आणि माध्यमांना शेतकऱ्यांच्या जमिनीपेक्षा रतन टाटांची काळजी असते. मग टाटाही आजवरची सभ्यता सोडून 'ममता, मेधा हव्यात की विकास' असा उद्दाम सवाल करतात! दु:खद बाब अशी की 'मध्यम-वर्गासाठी लाखात कार' अशी भुरळ पडणाऱ्या मध्यमवर्गाला ही नॅनो स्थानिक शेतकऱ्यांच्या घरादारावर फिरणारा नांगर ठरणार आहे याची सहवेदना राहिली नाही!

इतके दिवस शेतकऱ्यांच्या आत्म-हत्यांसंदर्भात त्रयस्थ राहणारा उच्च मध्यमवर्ग आर्थिक मंदी, आर्थिक घोटाळे आणि नोकर कपात यामुळे आता भानावर आलाय. आज दिसणारे चित्र इथून पुढे आणखी भयावह होणार आहे. पण 'स्व'त्व विकून महासत्ता, जागतिक बँक यांच्या बेलगाम निर्बंधासह विनाशकारी विकासाचे मॉडेल स्वी-कारणाऱ्या राजकारण्यांनी एका बाजूला धर्मवाद आणि दुसऱ्या बाजूने माफिया राज हाताशी धरून, जनआंदोलनात फूट पाडण्याची अथवा ती नेस्तनाबूद करण्याची सर्वपक्षीय मोहीम हाती घेतलीय. सवंग लोकप्रियतेसाठी माध्यमे या 'विनाशकारी विकासाची' भाट झालीत. क्रिकेटर, उद्योगपती, चित्रपट तारे यांना बाबा आमटे किंवा सुंदरलाल बहुगुणा यांच्या पंक्तीत बसवून ही माध्यमे आयकॉन आणि आयडॉलचे एसएमएसने खेळायचे रिॲलिटी शो खेळताहेत. कुणाचीही सद्सद्-विवेकबुद्धी जागृत राहणार नाही असा चंगच या नव्या माध्यम व माहितीच्या मायाजालाने बांधलाय आणि हा असा विचार मांडणारे पोथिनिष्ठ समाजवादी, गांधीवादी, कम्युनिस्ट म्हणून हेटाळणी करण्यात स्वयंघोषित पत्रपंडित दोन्ही हातांत लेखण्या घेऊन सरसावणार!

आमचा मुद्दा सरळ आणि सोपा आहे. या देशात विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्य आम्ही आणले. इथे लोकशाहीची संस्थापना, तिचा आदर आणि रक्षण घटनेत अनुस्यूत तत्त्व मानून आम्हीच करतो. सर्व प्रकारचे भेद नष्ट करून आदर्श मानवी जीवनाची संकल्पनाही आमचीच. इथल्या मातीत आम्हीच सोने उगवले, इथली शहरे आमच्याच घामांनी उभी राहिली. कारखाने केवळ उद्योगपतींच्या पैशांने नाही उभे राहिले, कामगारांनी तीन-तीन पाळ्यांत त्यासाठी घाम आणि रक्त एक केले. या देशाच्या रक्षणासाठीही या साडेसत्याण्णव टक्क्यांतला, नव्याण्णव टक्का धारातीर्थी पडलाय. जिथे आम्ही घाम आणि रक्त शिंपले तिथे आम्हाला विकास नकोय? आमचा मुद्दा ठाम आणि स्पष्ट आहे. विकास कुणाचा? कशासाठी? कुठे आणि कसा? आणि हा प्रश्न आम्ही जगण्यातून जसा विचारू तसा लिहिण्यातून आणि गाण्या-बजावण्यांतूनही विचारण्यासाठी हे विद्रोही साहित्य संमेलन!

आणि शेवटी दोन-तीन गोष्टी सांगतो आणि माझे हे भाषण थांबवतो.

त्यापैकी पहिली गोष्ट -

आज जगभर बराक ओबामाचं कौतुक होतेय. नव्या बदलाची नांदी म्हणून जगभर अमेरिकेचेही नाव होतेय.

या बराक ओबामाने, आपल्या संपूर्ण प्रचारात अमेरिकन जनतेला एकच शब्द दिला होता 'चेंज' म्हणजेच बदल. आज 'चेंज' आणि ओबामा हे समीकरण झालेय.

## अभिनंदन

### लक्ष्मण माने
### पद्मश्रीने सन्मानित

भटक्या-विमुक्तांसाठी शाळा उभारून त्यांच्या जीवनाला स्थैर्य देण्याचे कार्य लक्ष्मण माने यांनी केले. नुकतेच त्यांना पद्मश्री देऊन गौरवण्यात आले.

'ग्रंथाली' परिवारातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन.

'उपरा'कार म्हणून प्रसिद्ध असलेले लक्ष्मण माने हे 'ग्रंथाली'चे लेखक.

त्यांनी लिहिलेली, बंद दरवाजा, पालावरचं जग, भटक्याचं भारूड, उद्ध्वस्त, का कराचं शिकून?, क्रांतिपथ, ही सर्व पुस्तके 'ग्रंथाली'ने प्रकाशित केली आहेत.

माध्यमे तर नवाच शब्द सापडल्यासारखी जळीस्थळी 'चेंज' हा शब्द वापरतायत. नव्या युगाचा पासवर्ड म्हणूनही तो मिरवला जातोय.

पण या सगळ्यांना मला सांगायचेय, की या ओबामाचा प्रत्यक्ष जन्म व्हायच्या कितीतरी आधी या देशात, एका क्रांतिकारी कवीने सांगितले होते,

जग 'बदल' घालूनी घाव,
सांगून गेले मला भीमराव!
नुस्ता बदल सांगितला नव्हता!
घाव घालून बदल.

ओबामाचे कौतुक आम्हालाही आहे. पण तो जो बदल म्हणतोय ना, तो आमच्या बापाने आमच्याही जन्माअगोदर पन्नास वर्षांपूर्वी सांगून ठेवलाय!

आता अशीच दुसरी गोष्ट –

अलीकडेच अमेरिकेचे माजी अध्यक्ष बुश यांना त्यांच्या अध्यक्षीय कारकिर्दीतल्या शेवटच्या इराक दौऱ्यात एका इराकी पत्रकाराने 'जोडा' फेकून मारला.

माध्यमांनी हे 'जोडा' प्रकरण इतके रंगवले की तो जोडा ज्या कंपनीचा होता, त्यांच्या विक्रीत वाढ झाली.

जोडा फेकलेल्या पत्रकाराला सुरक्षा रक्षकांनी जोड्यांनीच तुडवले. पण तो पत्रकार 'हिरो' झाला.

पुन्हा आपण पंचवीस-तीस वर्षं मागे जाऊया.

स्थळ पुणे, युवक क्रांतिदलाचे त्यावेळचे प्रमुख कुमार सप्तर्षी आणि शंकराचार्य यांचा जाहीर वाद. सप्तर्षींच्या प्रश्नांना चक्रव्यूहातून शंकराचार्य जमेल तसे हुलकावण्या देत होते. या खंडनमंडनाला कंटाळून त्यावेळचे क्रांतिकारी पँथर नामदेव ढसाळ यांनी आपल्या पायातला चार इंची हिल वाला बूट काढला आणि शंकराचार्यांच्या डोक्यात घातला! मग संतप्त ब्राह्मणांनी नामदेवाच्या गळ्यात उपरणी टाकून फास आवळला' पण वाघ सुटला!

नामदेव ढसाळांना राग याच्यासाठी आला होता, की वाद जाहीर असल्याने लाऊडस्पिकर, माईक वगैरे होते. तर हे शंकराचार्य त्या वादात, माईकवरून यंत्र-युगाचा निषेध करत होते.

अशा निर्बुद्ध लोकांसोबत वाद कशाला, त्यांना हाणा असा खास त्यावेळचा ढसाळी हिसका शंकराचार्यांना बसला. आता शूद्रांना शंकराचार्य म्हणजे बुशच ना!

मथितार्थ असा,
आम्ही बुद्ध स्वीकारला असला तरी
युद्ध आम्ही विसरलेलो नाही.
आणि काळ कुठलाही येवो आमचा पासवर्ड एकच
'जय भीम!'

**संजय पवार**
४६ निर्मल रेसिडेन्सी, लेन १७,
डहाणूकर कॉलनी,
कोथरूड, पुणे ४११ ०२९
writingwala@gmail.com

ग्रंथाली

**विद्रोही साहित्य संमेलनात प्रकाशित झाले**




# पानीकम

**संजय पवार**

मार्मिक तपशीलांचा,
बिनतोड तर्काचा आणि
तारतम्याचं भान ठेवणाऱ्या
मूल्यविवेकाचा भक्कम आधार
असलेलं पुस्तक.

मूल्य १०० रुपये ● सवलतीत ६० रुपये

# बोलाचे साहित्य, बोलाचेच विश्व...

## अभय पाटील

पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाबद्दल काही लिहावं असं मला वाटत नव्हतं. बे एरियात मी सहा-सात वर्षं राहिलो. पंधरा वर्षांपूर्वी बे एरिया महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीवर काम केलं. देवनागरी फाँट अजून रुळला नसल्यानं हस्तलिखित पत्रकं पोस्टानं पाठवल्याचे दिवस अजूनही आठवतात. तरीसुद्धा होऊ घातलेल्या पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचं काही अप्रूप वाटत नव्हतं. पण एके दिवशी बातमी थडकली की आयोजकांनी महाराष्ट्र शासनाकडे अनुदान मागितलं आणि मा. मुख्यमंत्र्यांनी तडकाफडकी पंचवीस लाख रुपये मंजूरही केले!

कुणी-कुठे संमेलन भरवावं, किती पैसे खर्च करावेत, कोणाला बोलवावं आणि ते कसं साजरं करावं याबाबत कुणा तिसऱ्याला काही घेणं-देणं असायचं कारण नाही; पण जेव्हा अमेरिकेसारख्या प्रगत देशातले सुखवस्तू मराठी भगीरथ, थोडंसं विश्व-थोडंसं साहित्य आणि बहुतांशी मनोरंजन असा घाट घालून अनुदानाची उलटी गंगा महाराष्ट्रातून कॅलिफोर्नियाकडे वळवतात, तेव्हा मात्र निश्चित भूमिका घेऊन प्रश्न विचारणं हे प्रत्येकाचं कर्तव्य ठरतं. प्रश्न आवड-निवड किंवा मतभेदाचा नाही, तर नैतिकतेचा आहे.

प्रथम थोडंसं अमेरिकेतल्या देशी लोकांबद्दल. भारतातून जेव्हा मंडळी अमेरिकेत स्थिरावतात तेव्हा ती खूप बदलतात. ती कचरा रस्त्यावर फेकत नाहीत. वाहतुकीच्या नियमांचं पालन करतात. वेळेवर आणि पूर्ण इन्कम टॅक्स भरतात. इतकंच काय, सेल्स टॅक्स वाचवण्याचा विचार न करता पावतीचाही आग्रह धरतात. लाच न देता स्वत: शासकीय (अमेरिकन) कार्यालयात जाऊन ड्रायव्हिंग लायसन्स मिळवतात. भारतात सुट्टीला आलेले असले तरी पोस्टानं मतदान करतात. कधीही रांग मोडत नाहीत वगैरे... अनेक अर्थांनी ती अंतर्बाह्य स्वच्छ, नीतिमान आणि पारदर्शक होऊन जातात. भ्रष्टाचार- प्रत्यक्ष, लाक्षणिक अथवा नैतिक- त्यांना स्पर्शही करत नसतो.

हल्ली मात्र या नंदनवनात कुठेतरी कसर लागलेली आहे, असं जाणवू लागलंय. अनेक मराठी नाटकं आणि सिनेमाच्या व्हीसीडी, डीव्हीडी निर्मात्याची परवानगी न घेता, स्वामित्वहक्काची तमा न बाळगता अमेरिकेत राजरोस विकल्या जातात. काही दिवसांपूर्वी, माहितीचा अधिकार वापरून एका नागरिकानं जी माहिती उजेडात आणली ती अस्वस्थ करणारी आहे. दुष्काळ, भूकंप, पूर अशा आपत्तीग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी राखीव असलेल्या मुख्यमंत्र्यांच्या निधीतून पैसे घेऊन एका नाटक कंपनीनं व्यावसायिक मराठी नाटकांचा अमेरिका दौरा केला आणि त्यांना त्याबद्दल कुणी काही विचारलं नाही! थोडक्यात, अमेरिकेत आदर्श इमिग्रंट म्हणून वावरणारा भारतीय वंशाचा माणूस स्वजनांशी वागताना मात्र कधी कधी मूळ स्वभावावर जातो, असं दिसू लागलेलं आहे. मी या प्रकाराला 'i2i' interaction' म्हणजे 'Indian to Indian interaction' असं नाव दिलेलं आहे. एक भारतीय माणूस वा संस्था दुसऱ्या भारतीय माणूस वा संस्थेच्या समोर ठाकला की 'मूळ स्वभाव जाईना' हे दृश्य पाहायला मिळण्याची शक्यता खूप जास्त असते. भारतीय वकिलातीत भारतीय वंशाच्या लोकांना येणारे अनुभव बहुतेक वेळा याच धाटणीचे असतात.

आता वाचकांना हा प्रश्न पडला असेल की या 'i2i' वगैरेचा इथे संबंध काय? मी हे निदर्शनास आणू इच्छितो की विश्व साहित्य संमेलनाच्या अनुदानाबाबत जे घडलंय ते या घसरणाऱ्या मूल्यांच्या थिअरीत बरोबर बसतं. संमेलनाची वेबसाईट जर पाहिलीत तर तिथल्या आठ छायाचित्रांत एकही साहित्यिक दिसणार नाही. कार्यक्रमपत्रिकेत विविध कला-गुणदर्शनाचे आणि 'हसा चकट फू'सारखे धमाल विनोदी कार्यक्रम पाहायला मिळतील. पुन्हा एकदा मला सांगावंसं वाटतं की, कार्यक्रमांचा दर्जा आणि औचित्य मला खटकतंय हे खरं, पण माझं दुखणं वेगळं आहे. या मेळाव्यासाठी अमेरिकेतल्या मंडळानं महाराष्ट्र शासनाकडे अनुदान मागावं, हा एक प्रकारे नैतिक भ्रष्टाचारच आहे, असं मला वाटतं.

त्याचे वेळी हे दुसरं चित्रही पाहा. दर दोन वर्षांनी होणारं बृहन्महाराष्ट्र मंडळाचं अधिवेशन याच वर्षी (२००९) जुलैमध्ये फिलाडेल्फियाला होतंय. हजारोंच्या संख्येनं उत्तर अमेरिकेच्या कानाकोपऱ्यातून मराठी लोक या संमेलनासाठी येतात. मुख्य उद्दिष्ट मनोरंजनाचं असतं. पण त्याचबरोबर सामजिक क्षेत्रात कार्यरत व्यक्तींनाही आवर्जून बोलावलं जातं. महाराष्ट्र शासनानं अधिवेशनासाठी अनुदान जाहीर करायचं आणि आयोजकांनी ते नाकारायचं, अशी प्रथाच पडून गेलेली आहे. या वर्षी आयोजकांनी शासनाला जाहीर विनंती केली आहे की, आता तुम्ही अनुदानाची घोषणा करायचं थांबवा! अमेरिकेतली महाराष्ट्र

फौंडेशन ही संस्था दरवर्षी सामाजिक आणि साहित्य क्षेत्रात वेगळी वाट चोखाळणाऱ्यांना भरीव पारितोषिकं देते. कॅनडातली महाराष्ट्र सेवा समिती सामाजिक कार्याबरोबर मराठी भाषेच्या आणि साहित्याच्या क्षेत्रात काम करते. खुद्द कॅलिफोर्नियात 'कॅलिफोर्निया आर्ट्स असोसिएशन (कला)' ही संस्था नाट्य आणि कला क्षेत्रांत दस्तावेजीकरणाचं काम करत आहे. अशी अनेक उदाहरणं आहेत. थोडक्यात, उत्तर अमेरिकेतल्या अनेकांनी आपला वेळ, पैसा आणि क्षमता भारतातल्या सामाजिक आणि कला क्षेत्रांसाठी वापरण्याचा वसा पेललेला आहे. पण आज प्रथमच हे आक्रीत घडतंय, की अमेरिकेतल्या एका मेळाव्यासाठी थेट महाराष्ट्र सरकारकडून देणगी मागितली गेली!

चाकोरीबाहेरच्या कल्पना लढवून नवीन पायंडा पाडणं हे बे एरियातल्या मंडळींचं व्यवच्छेदक लक्षण आहे. कॅलिफोर्नियाला अमेरिकेची अमेरिका म्हणतात. कित्येक मराठी उद्योजकांची आणि नोकरदारांची ही कर्मभूमी. विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून नवीन लखलखीत पाऊलवाट उमटवण्याची पात्रता आणि क्षमता इथे नक्कीच आहे' पण ते सोडून महाराष्ट्रातल्या करदात्यांच्या पैशांनी साता समुद्रापार साजरा होणारा एक मनोरंजनाचा कार्यक्रम या पलीकडे काहीच घडताना दिसत नाही!

**अभय पाटील**
abhay.patil@gmail.com

## बे एरियातील साहित्य संमेलन

# व्यापक विचार व्हावा

**अनंत ठकार**

बे एरियातले साहित्य संमेलन आयोजित करण्याच्या निर्णयानंतर महाराष्ट्रात व बे एरियात, बुद्धिवंतांनी, पत्रकारांनी, वर्तमानपत्रांनी जे आक्षेप घेतले त्याला उत्तर देण्याचा व संमेलनाबाबत माझ्या काही मित्रांचा गैरसमज दूर करण्याचा हा प्रयत्न.

मी MMBA चा कार्यकर्ता नाही त्यामुळे लेखातील मते माझी असून बे एरिया मंडळाचा त्याच्याशी काही संबंध नाही.

बे एरियातील साहित्य संमेलनावर पुढील आक्षेप घेतले गेले.

१. सरकारचे पंचवीस लाख रुपये घेऊन अमेरिकेत (महाराष्ट्राबाहेर) संमेलन घेण्याचे प्रयोजन काय?
२. मराठी काय लगेच जागतिक होऊन Stanford ला शिकवणार काय?
३. तिथे किती लोक येणार?
४. साहित्य संमेलन की मनोरंजन?
५. काहींचा तात्त्विक विरोध.
६. काही बे एरिया रहिवाशांच्या विरोधामागे मूळ स्थानिक राजकारण.

ह्या सर्व वादविवादा मध्ये संमेलनाच्या मूळ उद्दिष्टांकडे दुर्लक्ष झाले.

कुठल्याही गोष्टीचा फायदा लगेचच होत नसतो, त्यासाठी थोडी गुंतवणूक अगोदर करणे जरुरी असते; पण हे चौकटीत राहून, संकुचित विचार करणाऱ्यांना कसे पटणार? प्रत्यक्ष कार्यक्रम होण्याआधी संमेलन failure म्हणून घोषित केले व आता यशस्वी झाल्यावर साहित्य संमेलन की मनोरंजन ह्यावर चर्चा!

साहजिकच, अमेरिकेत होणारे आणि महाराष्ट्रात होणारे संमेलन ह्यांच्यामध्ये फरक उपस्थितीचा असणे स्वाभाविक आहे. बे एरियात मराठी लोकांची संख्या पंधरा हजारांच्या आसपास, प्रेक्षागृहाची क्षमता आठशे, पुस्तके आणण्यास मर्यादा ह्यामुळे त्याचे scale व उद्दिष्ट नक्कीच वेगळे असणार. त्यामुळे त्याची महाराष्ट्रातील संमेलनाशी तुलना करणे चुकीचे आहे.

आज मराठी साहित्यिक आपले पुस्तक अभ्यासक्रमामध्ये कसे लागेल ह्याच्या पलीकडे जायला तयार नाहीत. गावाची वेस ओलांडल्याशिवाय प्रगती होत नाही. भाषा, साहित्याबाबतही ते लागू पडते. 'ग्रंथाली'च्या ग्रंथयात्रेचा उद्देश शहरापासून ग्रामीण भागापर्यंत वाचनाची आवड कशी वाढवावी हाच होता. त्याचा फायदा आज दिसून येत आहे.

संमेलन अमेरिकेत भरवण्याचा उद्देश असा, की आजमितीला जे साहित्यिक आहेत त्यांचे विषय, आशय बदलत्या परिस्थिती-नुसार व्यापक व्हावेत, नवीन लोकांच्या ओळखीने नवीन कल्पना येऊन वेगळ्या प्रकारचे साहित्य निर्माण व्हावे. आज साहित्यामध्ये traditional साहित्यिकसमवेत इतर क्षेत्रांतील नामवंत लोकांचे साहित्य मोठ्या संख्येने प्रकाशित होत (नरेंद्र जाधव, चेतन भगत...) आहे. त्यांच्या जीवनात आलेले अनुभव, त्यांनी विविध क्षेत्रांत केलेली प्रगती पुस्तकरूपाने इतरांना स्फूर्ती देऊन नवीन साहित्यिक निर्माण होण्यास मदत होईल. राजा-राणीच्या अभिजीत पाटील यांना व्हिसा सोपस्कार, अमेरिका सहलीबद्दल आलेल्या अनुभवावर एक छानसे पुस्तक अथवा ब्लॉग लिहिता येईल.

महाराष्ट्र सरकारकडून अनुदान घेऊन संमेलन अमेरिकेत का भरवावे? हा आणखी वादाचा विषय. पंचवीस लाख रुपयांच्या अनुदानावर आक्षेप घेण्यापूर्वी येथील कार्यकर्त्यांनी केलेल्या श्रमाचे मोजमाप करणे आवश्यक आहे. कार्यकर्त्यांनी रजा काढून घरच्या कार्यासारखे वाहून घेतले होते.

महाराष्ट्र सरकारचे वार्षिक बजेट ऐंशी हजार कोटींचे असते. त्यातून पंचवीस लाख अनुदानासाठी पोटदुखी होण्याचे काय कारण? संमेलन आयोजित करण्यास आर्थिक बळ अत्यावश्यक असते, त्यासाठी महाराष्ट्र सरकार, वा केंद्र सरकारने जरी मदत दिली तरी घ्यावी. चांगल्या कार्यासाठी पैसे मागण्यात गैर कय? सरकारी प्रोत्साहनामुळे व आर्थिक मदतीमुळे आज महाराष्ट्रातील लोककलेला (लावणी...) परत चांगले दिवस आले आहेत. आज चांगल्या घरच्या मुली समारंभामध्ये लावणी करण्यास लाजत नाहीत, कारण लोकप्रियता.

Having said all above, माझ्या माहितीप्रमाणे, कायदेशीर नियमांनुसार महाराष्ट्र सरकार बे एरिया महाराष्ट्र मंडळाला (MMBA) अनुदान देऊ शकत नाही. पंचवीस लाखांचा चेक महाराष्ट्र राज्य साहित्य महामंडळाला दिला गेला आहे. त्यामुळे प्रत्यक्ष MMBA ला कुठलीही आर्थिक मदत महाराष्ट्र सरकारकडून मिळालेली नाही.

कार्यक्रमाच्या स्वरूपावरून व संकेत-स्थळावरून काहींनी साहित्य संमेलन की मनोरंजन? असा मुद्दा उपस्थित केला. संकेतस्थळांबरोबर साहित्यिकापेक्षा कलाकारांना महत्त्व दिले गेले ह्याबद्दल मी पण सहमत आहे आणि तसे करणे चूक आहे. परंतु साहित्य संमेलनाचे स्वरूप कालाभिमुख राहून बदलले पाहिजे. साहित्य संमेलन आणि मनोरंजन ह्यांची सांगड घातल्यास संमेलने रटाळ होणार नाहीत. साहित्यामध्ये रुची निर्माण होण्यासाठी, नाट्य, संगीत आणि चित्रपट याही माध्यमांचा प्रभावी उपयोग होणे जरुरी आहे. मराठी साहित्यावर आज किती चित्रपट निघाले आहेत? कलाकार, दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथाकार व साहित्यिक ह्यांचे networking होणे जरुरीचे आहे.

साहित्यिकांसाठी तंत्रज्ञानाचा, इंटरनेटचा आधार लिखाण व संदर्भासाठी कसा करता येईल, ह्यासाठी संमेलनात चर्चासत्र असणे जरुरीचे आहे. ब्लॉग, ऑडियो बुक्स, You Tube, itunes ह्या नवीन टुल्सचा उपयोग करून साहित्य जास्तीत जास्त लोकांपर्यंत कसे पोचवता येईल ह्यासाठी संमेलनात चर्चासत्र असणे जरुरी आहे. हे सर्व होण्यासाठी संमेलनात इतर क्षेत्रांतील मान्यवर लोकांचा सहभाग व साहित्यिकांचे त्यांच्याशी networking होणे जरुरी आहे. थोडा व्यापक विचार केल्यास संमेलने महाराष्ट्रापुरती मर्यादित न राहता, मराठी बहुसंख्य असलेल्या ठिकठिकाणी व्हावीत जेणेकरून मराठी भाषा, साहित्याची लोकप्रियता वाढीस लागेल. ह्या गोष्टींबद्दल बुद्धिवंतांनी विचार करण्याऐवजी बे एरिया-तले संमेलन स्थळावरून वाद घालण्यात धन्यता मानली!

महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी मनो-रंजनाच्या कार्यक्रमाला जास्त प्रसिद्धी दिली. त्यामुळे गैरसमज जास्त झाला. कविता-वाचन, कथाकथन, संत वाङ्मयावरील परिसंवादासुद्धा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. डॉ. रामचंद्र देखणे, मिलिंद जोशी ह्यांच्या प्रभावी विचारांबद्दल कोणी लिहिले नाही ह्याचे वाईट वाटते. सिंधुताई सपकाळ ह्यांचे चरित्र कर्नाटक शालेय अभ्यासक्रमात आहे पण महाराष्ट्रात त्याबद्दल अनभिज्ञता!

ह्या संमेलनात झालेला digital content (फोटो, व्हिडिओ, स्ट्रिमिंग) संकेतस्थळावरून उपलब्ध केला पाहिजे जेणेकरून तो जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचेल.

उज्ज्वल भविष्यासाठी थोडी गुंतवणूक अदोगर करणे जरुरी असते, बे एरियातील संमेलन त्या दृष्टीने केलेली गुंतवणुकीची मुहूर्तमेढ ठरो अशी सदिच्छा.

**अनंत ठकार**
Cupertino
ainfinity@gmail.com

## अरुण बेलसरे ह्यांचे आकस्मिक निधन

'ग्रंथाली-ज्ञानयज्ञ'मधील 'गावसकर-तेंडुलकर' या पुस्तकाचे लेखक अरुण बेलसरे ह्यांचे पुण्यात हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मिक निधन झाले. ते ५८ वर्षांचे होते. सर परशुरामभाऊ महाविद्यालयात इंग्रजी शिकवत. त्यांच्या मागे त्यांच्या प्राध्यापक पत्नी, वैजयंती बेलसरे आहेत.

बेलसरे ह्यांना क्रिकेटचे विलक्षण वेड. ते स्वत: पुण्यात 'क्लब ऑफ महाराष्ट्र'तर्फे स्थानिक सामने नियमित खेळत; नव्या खेळाडूंना मार्गदर्शनही करत. त्यांची क्रिकेटची आवड आणि इंग्रजी लेखनातील लालित्य ह्यामुळे त्यांचे 'पुणे टाइम्स'मध्ये लेखन प्रसिद्ध होई.

'ग्रंथाली-ज्ञानयज्ञा'त त्यांनी 'गावसकर-तेंडुलकर' असे अफलातून पुस्तक लिहिले. त्यात दोघा श्रेष्ठ फलंदाजांच्या कामगिरीची व शैलीची तुलनात्मक मांडणी केली आहे. या पुस्तकाच्या दोन आवृत्ती समारंभपूर्वक प्रसिद्ध झाल्या.

बेलसरे ह्यांचे इंग्रजी भाषेवर प्रेम. त्यामुळे ते इंग्रजी शिक्षकांचे प्रशिक्षणवर्ग घेत असत.

# जागतिक आर्थिक मंदी व भारत

यशवंत अ. पंडितराव

गेल्या काही महिन्यांपासून जागतिक स्तरावर आर्थिक क्षेत्रात एक वादळ घोंगावत आहे. अर्थशास्त्रज्ञांनी ह्या वादळाची तीव्रता, गती व व्याप्ती बघून जागतिक पेंचप्रसंग म्हणजे जागतिक आर्थिक मंदी अशी त्याची संभावना केली आहे. १९२९ च्या आर्थिक मंदीनंतर प्रथमच एवढा मोठा आर्थिक पेचप्रसंग अनुभवास येत आहे. ही मंदी १९२९ च्या मंदीप्रमाणे अमेरिकेतूनच सुरुवात झालेली आहे. परंतु १९२९ ची मंदी व आजची मंदी ह्यात गुणात्मक फरक मोठा आहे, जरी त्याचे परिणाम सारखेच आढळतात. वित्तसंस्थांची दिवाळखोरी, कारखानदारी उत्पादनात घट, बेरोजगारी किमतीत घट व शेअरबाजारात प्रथम निरुत्साह व नंतर निराशा व ह्या सगळ्यांचा सकल राष्ट्रीय उत्पन्नावर व वाढीवर परिणाम. दहीहंडीत जसा एक जरी गोविंदा कच्चा निघाला तरी सारेच कोसळतात. तसा, मग आर्थिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रात मंदीचा भाव जाणवतो.

१९२९ ची मंदी ही औद्योगिक मंदी होती. औद्योगिक उत्पादनात व त्या उत्पादनाला हव्या असलेल्या मागणीत ताळमेळ न राहिल्याने ती उद्‌भवली होती. सोविएट युनियन सोडून बाकी सर्व देशाना त्या मंदीचे चटके बसले. अभिजातवादी (Classical) व नवअभिजात वादी (New-Classical) अर्थशास्त्रज्ञांचा 'से' ह्या अर्थशास्त्राच्या उत्पादनवर मागणी व रोजगार निर्माण करते म्हणून उत्पादन वाढते ठेवा; कोणत्याही अर्थव्यवस्थेत तात्पुरत्या स्वरूपाचे अल्पकालीन पेचप्रसंग निर्माण होत असतात. पण दीर्घकाळात उत्पादन, मागणी, विक्री व रोजगार ह्यात समतोल होतोच!, ह्या प्रतिपादनावर दृढविश्वास होता. पण १९२९ ची मंदी दिवसेंदिवस तीव्रच होत गेली व रेंगाळली. 'से'चे प्रतिपादन फोल ठरले. किन्सला ह्या प्रतिपादनाचा फोलपणा आधी उमगला व सरकारी हस्तक्षेप-दीर्घकालीन समतोलाची वाट पाहाता आवश्यक आहे हे समजले व त्यातूनच नवअर्थशास्त्राचा जन्म झाला. त्याचवेळी अमेरिकेत प्रे.रुझवेल्टनी 'न्यूडील' जाहीर केले व टेनेसी व्हली प्रोजेक्ट कार्यान्वित केला व त्याचे सुपरिणाम दिसल्याने किन्सच्या मताचे महत्त्व लोकांना कळले. किन्सने सरकारने केवळ चलनाबाबत व करसवलती देऊन न थांबता, पुढाकार घेऊन अंदाजपत्रके तुटीची करून सार्वजनिक भांडवली गुंतवणूक करावी असे आग्रहाने सांगितले. बंद पडलेल्या गाडीला जसा 'किक् जर्क' द्यावा लागतो तसे अर्थव्यवस्था चलनवाढ करून गुंतवणूक करावी म्हणजे अर्थव्यवस्था पुनःसुरळीत चालेल. गेली ७०-७५ वर्षे अनेक राष्ट्रांनी ह्या नव्या विचारानुसार अर्थव्यवस्था चालू ठेवल्या. बारीकसारीक अडचणी आल्या पण त्या निभावता आल्या. आज मात्र या उपाययोजना कितपत उपयोगी ठरतील ह्याबाबत शंका वाटात आहे. एक तर १९२९ पेक्षा २००८ साली जगातील सर्व देशांच्या अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर परस्परावलंबी झालेल्या आहेत. कारण गेली ३०-४० वर्षे जागतिकीकरणाचे वारे वाहत आहे. तसेच ह्या वेळी चीनसारखे समाजवादी राष्ट्रही ह्या वावटळीपासून अलिप्त नाही. कारण आता भांडवलशाहीचे स्वरूप औद्योगिक भांडवलशाहीपेक्षा वित्तीय भांडवलशाहीच्या स्वरूपात आहे. जगभर परकीय भांडवलाची गुंतवणूक वाढली आहे. १९२९ मध्ये IMF, World Bank आंतराष्ट्रीय नाणेनिधी जागतिक बँक किंवा Wto जागतिक व्यापार संघटना सारख्या संघटना नव्हत्या. आज ह्या संघटनांवर धनवान राष्ट्रांचे प्रभुत्त्व आहे व ह्या धनवान राष्ट्रांत आर्थिक पेचप्रसंग निर्माण झाल्याचे परिणाम ह्या संस्थाच्या कारभारावर होणे अपरिहार्य झाले आहे. १९२९ पेक्षा २००८-०९ सालामध्ये फरक असा की आता राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेत रचनात्मक (Structural) फरक झाला आहे. १९२९ मध्ये त्या वेळच्या पुढारलेल्या अर्थव्यस्थेत प्राथमिक क्षेत्र महत्त्वाचे होते. त्यानंतर दुय्यम ज्यात उद्योग कारखानदारी येते व (tertiary) सेवाक्षेत्र तुलनेने लहान होते. आता सेवाक्षेत्राचे महत्त्व खूप वाढले आहे व भारतासारख्या विकसनशील देशातही सेवाक्षेत्राचा G D P मध्ये हिस्सा ५० टक्के आहे, पण त्यावर अवलंबून लोक मात्र केवळ २५ टक्के आहेत तर प्राथमिक क्षेत्राचा हिस्सा २० टक्के व लोकसंख्या ५० टक्के अवलंबून आहे. थोडक्यात, जागतिक अर्थव्यवस्थेतील पिरॅमिड उलटा झाला आहे. साहजिकच वित्तीय संस्थांचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व कमालीचे वाढले आहे व त्यांच्यातील समस्या जाचक झाल्या आहेत. त्याचबरोबर आता कॉर्पोरेट सेक्टरमध्ये वैयक्तिक मालकीच्या जागी जॉइंट स्टॉक कंपनीची पद्धती रूढ झाली आहे व सत्यमसारखे प्रकार वाढले आहेत.

गेल्या ३०-३५ वर्षात लोकांच्या जीवनपद्धतीत फार मोठा फरक झालेला आहे. 'One man's expenditure is another man's income' म्हणजे जेव्हा एखादा माणूस खर्च करतो तेव्हा तो दुसऱ्या

कोणासतरी उत्पन्न मिळवून देतो. ह्याबाबतीत नुकतेच पॉल कुगमन ह्यांनी दाखून दिले की वैयक्तिक व सामूहिक बचतीचा दर घसरला आहे व debit-equity ratio व्यस्त झाला आहे. ह्या उक्तीप्रमाणे सर्वत्र खर्च करण्याची लाटच उसळलेली आहे. rift म्हणजे बचत हा पूर्वी गुण मानत आता तो अवगुण समजला जातो. त्यामुळे क्रेडिट कार्ड घेणे सुबत्तेचे लक्षण समजले जाते व बँकाही जनतेला क्रेडिट कार्ड घेण्याचा आग्रह करतात. पूर्वी, खरेदीपूर्वी निगेटिव्ह टेस्ट लावली जाई. त्यावाचून अडेल का हा विचार केला जाई, पण आता हा खुळेपणा ठरत आहे. स्वत:ला हवे का नको ह्यापेक्षा दुसऱ्याकडे आहे मग माझ्याकडे का नको? ह्या विचाराचा प्रभाव वाढला आहे. आता लोक वस्तू नादुरुस्त झाल्यास दुरुस्त करण्याऐवजी मोडीत काढतात व नवी घेतात. कारण मग एक तर अद्ययावत वस्तू मिळते व दुरुस्तीचा खर्चच हल्ली जास्त येतो तो टाळता येतो. आजकाल माणसे भावाविषयी घासाघीस करीत नाहीत. हल्ली तर पॅक्ड वस्तूवर MRP म्हणजे जास्तीत जास्त किरकोळ किंमत लिहितात. ती भ्रामक असते, पण लोक ती स्वीकारतात. त्यामुळे नवे मॅनेजमेंट तंत्र म्हणजे किंमत ही देणाऱ्याच्या ताकतीवर व इच्छेवर ठरते. म्हणून परळ-लालबागेत ज्या वस्तूला कमी भाव तर कुलाब्यात दुसराच भाव व तोही चढा. असा प्रकार पॅक्ड नसलेल्या वस्तूबाबत सहसा आढळतो. तसेच, आजच्या विक्रेत्याचे कौशल्य हे जर तो एस्किमोला बर्फाचा गोळा विकण्यात यशस्वी झाल्यास वरच्या दर्जाचे असे मानले जाऊ लागले आहे. थोडक्यात, वस्तूंची किंमत पूर्वी अभिजातवादी व नवअभिजात वादी मानत तशी उत्पादन खर्चाशी ताळमेळ राखून ठरेल हे तत्त्व निकालात निघाले आहे. म्हणून किमतीत बेबंदशाही आढळते. हेच तत्त्व नोकरदाराना पगार,भांडवलावरील लाभांश ह्यांत आढळतो. कामानुसार रोजी व समान कामाला समान वेतन हे तत्त्व जाऊन Capacity to pay म्हणजे देणाऱ्याची कुवत ह्यावर ठरल्याने रोजी व वेतन ह्यात काहीच सुसंवाद उरलेला नाही. पूर्वी कर्जावरील व्याजाच्या दरांतील फेरफाराने आर्थिक व्यवहारावर परिणाम होत असे. आता हे अस्त्र निरुपयोगी ठरत आहे. 'Interest is regulation of flow of money' आज उपयुक्त ठरत नाही. त्यात काळा पैसा प्रभावी ठरतो व व्याजाच्या आमीषापेक्षा राजरोसपणे बाजारात कसा येईल हा विचार प्रभावी असतो.

पूर्वी शेअर मार्केटमध्ये दैनंदिन फरक काही अशांत्मक होत असे. आता चढउतार एवढे तीव्र असतात की एका दिवसात माणूस रंकाचा राव होतो नाहीतर रावाचा रंक होतो. ते आता Capital market राहिले नाही. म्हणजे ज्या उद्योजकाकडे उत्पादक कार्यक्रम आहे; धाडस आहे, पण पैशांचे पाठबळ नाही त्याना ह्या Capital market म्हणजे शेअर बाजारात ती सुविधा होती. आज तो सट्टेबाजार झाला आहे. ज्या देशात आर्थिक जगतात उच्चपदास पोचण्यास टाटाना १२५ वर्षे राबावे लागले तेथे अंबानी २५-३० वर्षांत उच्चस्थान मिळवतात! हे कसे शक्य झाले? तर भांडवल बाजारातील किमयेवर, बँकाकडून ओव्हर ड्राफ्ट घेऊन शेबर बाजारात धंदा करणारे अनेक जण आहेत. खिशात दमडा नसताना क्रेडिट कार्ड बाळगणारे अनेक आहेत. बँका बँकिंगच्या मूलभूत तत्त्वाना सोडून वागू लागल्यास अडचणीत येणारच. इन्शुरन्स कंपन्या रिस्क शेअरिंग च्या तत्त्वावर चालतात. त्यांनी प्रमाणाबाहेर धोका पत्करला तर काय होईल? नॉन बँकिंग कंपन्यांनी त्यांच्या चार्टनुसार काम केले नाही तर? तसेच, जर ऑडिट कंपन्या आपली 'Watch dog' ही संरक्षक भूमिका सोडून वागल्यास जनतेने पैशांच्या सुरक्षितेसाठी कुठे जावे? शासनकर्ते तुटीची अंदाजपत्रके लादून जर भाववाढीच्या आगीत सामान्य माणसाला ढकलतील तर त्यावर काय इलाज? जॉईंट स्टॉक कंपन्यात मामुली गुंतवणूक करून तिच्या कारभारावर ताबा मिळवणे आता शक्य झाले आहे. तसेच Socirkes Registration Act खाली रजिस्टर झालेल्या संस्थात मूळ हेतू बाजूला राहून अहितकारक गोष्टी चालतात, तेच सहकारी संस्थाबाबत सत्तेसाठी ह्या संस्थांचा शिडी म्हणून वापर होतो.

किन्सने जेव्हा तुटीचे अर्थकारण प्रतिपादन केले तेव्हा त्याने मानवी स्वभावांचे एक व्यावहारिक सत्य ओळखले होते. लोक आपणहून बेरोजगारी स्वीकारणार नाहीत तसेच आपणहून पगारात कपात मानणार नाहीत. मग त्यावर रामबाण उपाय म्हणजे चलनवाढ करून लोकांचे वास्तविक जीवन वेतन (real wages) घटवायचे. मग लोकांस त्यांचा खिसा केव्हा व कसा कापला गेला तो कळणारच नाही. म्हणजे किन्स हा श्रेष्ठ 'खिसा कापू' होता व लोकांनी त्याला स्वीकारले. लोकांना खिशात पैसा खुळखुळला की बरे वाटते, पण बाजारांत त्या पैशाने काय मिळाले ह्याची चिंता नसते.

१९८० नंतर भारतात चंगळवाद बोकाळला. आपल्या नेत्यांच्या दैनंदिन जीवनशैलीत झालेला फरक त्याचा निदर्शक आहे. काही देशांत भाववाढ झाली पण आर्थिक प्रगती मंदावली. त्याला फ्रिडमनने Stagtation म्हणून संबोधले. थोडक्यात, जागतिक अर्थव्यवस्था अशा टप्प्यावर येऊन पोचली आहे की मागे जाता येत नाही व पुढचे दिसत नाही. किन्सने सांगितले की In the long run all are dead मग उद्याची कशाला बात? आजचे आज बघा. पण आजच जर डोळ्यांपुढे काजवे चमकले तर जिणे हराम होईल त्याचे काय?

ही जागतिक मंदी किती काळ राहील ह्याचा अंदाज बांधणे कठीण आहे. ह्या मंदीबाबत, विशेषतः कारणाबाबत अर्थशास्त्रात अनेक मतप्रवाह आहेत. काहींच्या मते ही मंदी वित्तीय संस्थांच्या बेजबाबदार वर्तनातून व संस्थांच्या नित्य व नैमित्तिक व्यवहाराबद्दल घालून दिलेल्या

शिस्तीस व नीतिनियमाच्या उल्लंघनातून निर्माण झालेली आहे. बँकानी बँकासारखे वागले पाहिजे. ते लोकांच्या गुंतवणुकीचे ट्रस्टी आहेत. इन्शुरन्स कंपन्यानी जोखीम किती घ्यायची ह्याबाबत शास्त्रशुद्ध नियम आहेत, तसेच सरकारांनी तुटीची अंदाजपत्रके सादर करताना सामाजिक दुषपरिणामाचा विचार करायला हवा. रिगन ह्यांच्या काळात व्याजाचे दर घटवले गेले. इतके की marginal effiernary of capital चे स्वप्न दाखवले गेले. व गहाणखताला इन्शुरन्स कव्हर मिळाले. ह्यातूनच घरांचे भाव गडगडल्यावर सब् प्राईम क्रायसीस निर्माण झाला व ते लोण सर्वत्र पसरले. वित्तीय व अन्य संस्थांनी आपल्या ध्येयधोरणांस अनुसरून आर्थिक शिस्त पाळली पाहिजे. दुसरे मत असे, की Structural nonbalance अर्थव्यवस्थेत जो रचनात्मक असमतोल निर्माण झाला आहे तोच ह्या पेचप्रसंगाला कारण आहे. केवळ निर्यातीमुळे बक्कळ फायदा होतो म्हणून चीनने निर्यात वाढवली, पण आज निर्यातीत घट झाल्याने चीनच्या अर्थव्यवस्थेत जबरदस्त पेचप्रसंग उद्भवला आहे. भारतासारख्या देशानी परदेशी भांडवलाला पायघड्या घालून आमंत्रण दिले, पण आर्थिक पेचप्रसंग निर्माण होताच ह्या गुंतवलेल्या भांडवलाने काढता पाय घेतला व आपले अनेक प्रोजेक्ट अडचणीत आले. चीनने झपाट्याने आर्थिक विकास करण्याचा कार्यक्रम आखला, पण त्याची किंमत त्यांना पर्यावरणावर पडलेला ताण व नैसर्गिक संपदेच्या विनाशाने मोजावी लागत आहे. विकासाच्या प्रवासांत शॉर्टकट नसतो एवढे सत्य जगासमोर आले.

१९२९ च्या मंदीनंतर काही काळ विचारवंतांना भांडवलशाही म्हणजे मागणी व पुरवठा ह्यांचे नियंत्रण करणाऱ्या व किंमत निर्धारण करणाऱ्या बाजारपद्धती विषयी व उत्पादन साधनावरील खाजगी मालकीबाबत साशंकता निर्माण झाली होती. काहींचा समाजवादाकडे कल होता. पण मग किन्सच्या नव्या अर्थशास्त्राने पुनश्च भांडवलशाहीला नवे बळ लाभले. किन्स जरी सरकारप्रणित सार्वजनिक भांडवली गुंतवणुकीचा खंदा पुरस्कर्ता होता व त्यासाठी तुटीचा अर्थसंकल्प करावा अशा मताचा होता तरी तो समाजवादाचा पुरस्कर्ता नव्हता. भांडवलशाहीतील वैगुण्ये काढल्यास हीच पद्धत चिरस्थायी होईल असे त्याचे मत होते. शुपीटरला भांडवलशाही स्व:ताच स्व:ताला जखमी करील असे वाटत होते तर लेनिन व रोझा लक्सेंबर्गना भांडवलशाही आता साम्राज्यशाहीत परिवर्तीत झाली असून ती तिच्या अंतिम घटका मोजत असल्याचे वाटले. तरीही भांडवलशाही व बाजारपध्दती व उत्पादनसाधनावरील खासगी मालकीची व्यवस्था टिकली ती जवळजवळ ७८ वर्षे. आता मात्र भांडवलशाही व लोकशाही ह्या द्वंद्वाला टिकवयाचे असेल तर काही मूलभूत बदल करावे लागतील. आतापर्यंत, अमेरिका व भारत धरुरून अनेक देशांनी वेगवेगळे उपाय केले त्यात बेल ओ स्टिम्युलस-पॅकेज जाहीर केले. व्याजाचे दर घटवले. मध्यवर्ती बँकेने CLR कमी केला. रिपोरेट कमी केला. बांधकाम व्यवसाय ड्रायव्हिंग इंजीन म्हणून सवलती दिल्या. महसूलात एक्साईज, कस्टम्स दरांत कपात केली. अमेरिकेत तर बँकाना डायरेक्ट मदत दिली, पण अद्याप त्याचा म्हणावा तेवढा प्रभात पडलेला दिसत नाही. ह्या उपाययोजना मलम पट्टीच्या स्वरूपातल्या आढळतात.

म्हणजे आता काही मूलभूत उपययोजना कराव्या लागतील. ह्या संदर्भात काही बाबतींत तडजोडीस जागा नाही त्या बाबी कोणत्या? जगात लोकशाही संस्था टिकली पाहिजे. कारण अनुभवाने दिसून आले आहे की अन्य कोणत्याही राज्यपध्दती-पेक्षा व्यक्तिस्वातंत्र्यावर, पक्षपद्धतीवर आधारलेली व सेक्युलर विचारावर आधारलेली व न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य अबाधित ठेवणारी. शासन व सेवा ह्यावर मुलकी स्वामित्त्व असलेली व कायद्याला धरून व्यक्तिनिरपेक्ष राज्यपद्धती चांगली म्हणून टिकली पाहिजे. त्याचबरोबर ॲडम स्मिथने प्रतिपादन केलेली, मागणी व पुरवठा ह्याच्यात तोल संभाळणारी व किंमत ठरवणारी बाजारव्यवस्था काळाच्या कसोटीवर टिकली आहे व वस्तूंचे भाव निश्चित करण्यासाठी ह्यापेक्षा अन्य पर्याय उपलब्ध नाही. ऑस्कर लॉज ह्यांनी पर्याय कमांडिंग हाईट्स सुचवला पण तो व्यवहार्य ठरला नाही. ह्या शिवाय, शासनाने तटस्थ भूमिका न ठेवता योग्य वेळी हस्तक्षेप करणेही सामाजिक हिताच्या दृष्टीने आवश्यक असते. तसेच आता सत्ताधाऱ्याला कल्याणकारी अर्थशास्त्राची कास सोडता येणार नाही. कर हे केवळ महसूल गोळा करण्यासाठी नसून त्याला सामाजिक व नैतिक उद्दिष्ट असते.

ह्या संदर्भात महात्मा गांधीच्या विचारांतील एका महत्त्वाच्या सूत्राचा विचार व्हावा. महात्मा गांधीच्या मते, कोणत्याही आर्थिक व्यवहाराचे तीन प्रमुख घटक असतात. पहिला घटक वस्तू वा सेवेचा निर्माता. दुसरा घटक अंतिम ग्राहक व तिसरा घटक म्हणजे उत्पादक व ग्राहक ह्यांना जोडणाऱ्या सेवा. ह्या तीन घटकांत समतोल असल्यास समाजात सामंजस्य राहते व प्रगती होते. उत्पादकाला त्याच्या श्रमाचा योग्य तो मोबदला मिळाला पाहिजे. ह्यात केलेले श्रम, वस्तूची वाढवलेली उपयुक्तता व त्यासाठी लागणारे कौशल्य व दुर्मिळता ह्यांचा विचार होतो. अंतिम ग्राहकाला वस्तू-सेवा योग्य दर्जाची, गरज भागवणारी व योग्य त्या भावात; जेव्हा हवी तेव्हा मिळायला हवी. मग दोहोना जोडणाऱ्या एजंटचे काय? यात अनेक लहान लहान घटक येतात. ज्याला आपण वरखर्च म्हणूया. ह्यात मॅनेजर, सुपरवायझर, स्टोरेज, ट्रान्सपोर्ट, जाहिरात, फायनान्स वगैरे सर्व बाबी येतात. नफासुद्धा सम्मिलित असतो. महात्मा गांधीजीच्या मते, हे सारे वरखर्च उत्पादन खर्चाच्या वर काही प्रमाणात निश्चित केले जावेत मग ते २० टक्के असो वा ४० टक्के पण ते वस्तुनिहाय व

सेवानिहाय निर्धारित करावेत व ही शिस्त लावून घेतली तर आर्थिक पेचप्रसंग उद्‌भवणार नाहीत. गांधीजी सुनिश्चित वरखर्चाला –'लक्ष्मण रेषा' म्हणत व ती पाळली गेली तर ते खरे अर्थशास्त्र व ती ओलांडली तर अनर्थशास्त्र होईल असे ते मानत. आज ह्या वरखर्चाचे प्रमाण अव्वाच्या सव्वा वाढले आहे त्यावर अकुंश हवा. आज उत्पादनखर्च व अंतिम ग्राहकाला मिळणारा भाव ह्यात ताळमेळ नाही. खादीच्या मूल्यनिर्धारणात आजही ही लक्ष्मणरेषा पाळली जाते. मग अन्य उद्योगांत का शक्य नाही?

ह्या आर्थिक पेचप्रसंगात एक गोष्ट स्पष्ट झाली ती म्हणजे. अन्य देशांच्या मानाने भारतात ह्या जागतिक मंदीचे दुष्परिणाम कमी प्रमाणात दिसून येतात. ह्याची कारणे दोन. एक, भारताने मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारलेली आहे व त्यामुळे एकूण अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्राचे हितसंबंध जपूनही सामाजिक नियंत्रण काही प्रमाणात आहे व ते सेफ्टी व्हॉल्वसारखे आहे व दुसरे असे की भारतातील वित्तसंस्थांचे १९६९ साली जे राष्ट्रीयकरण झाले व त्या आधी व नंतर इन्शुरन्स कंपन्याचे राष्ट्रीयकरण झाले त्यामुळे त्यांच्या कारभारावर सामाजिक नियंत्रण आहे. म्हणून इथे बँका आपले व्यवहार बँकिंगच्या तत्त्वांनुसारच करतात. इन्शुरन्स कंपन्या नियमानुसार कारभार करतात. त्यामुळे वित्तीय क्षेत्रात तरी सुरक्षितता आहे. शेअर बाजारात चढउत्तार होतात व ह्याबाबतीत सेबीने कार्यक्षमतेने गैरव्यवहार रोखले पाहिजेत. पण एकूण भारतीय अर्थव्यवस्थेत शेअर बाजाराचे (तो बॅरोमीटर नाही) स्थान फारच मार्यादितच आहे. तिसरी जमेची बाजू म्हणजे शेती उत्पादनात स्वावलंबन. शेती हा फार मोठा Shok absorbe घटक आहे. चौथी जमेची बाजू म्हणजे भारताने चीनप्रमाणे निर्यातीवर भर न देता देशातील अन्तर्गत बाजारपेठ; जी विस्तृत आहे तिच्यावर जास्त भर दिला आहे. अर्थात आजही काही भारतीय उद्योग विशेषत: (Consumer durables) समाजातील २० टक्के उच्चमध्यम व धनिकांच्या मागणीचा विचार करतात पण त्यांनाही जाणीव झाली आहे की ते चूक आहे. आता बिल्डर लहान फ्लॅटचा विचार करीत आहेत. उत्पादक किमती कमी करण्याचा वा त्याच किमतीत जास्त वस्तू देण्याचा विचार करीत आहेत हे योग्यच आहे. जर किमती कमी करून ग्रामीण बाजारपेठेवर भर दिला तर भारतात पेचप्रसंग उद्‌भवणार नाही. म्हणून गांधीजी ग्रामीणक्षेत्रात उत्पन्नाची साधन क्रियशक्ती वाढवण्यावर भर देत होते त्याचे हे मर्म. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतातील 'लेबर कॉस्ट' म्हणून 'श्रममूल्य' अन्य देशांच्या तुलनेने कमी आहे. म्हणून चलनवाढ करताना Labour Cost वाढणार नाहीना ह्याचा विचार ठेवावा. म्हणजे जर आपण आपल्या श्रम करणाऱ्या लोकांची उत्पादकता रोजगार क्षमतेला बाधा न आणता, लोकशिक्षणाने, तंत्रशिक्षणाने व तत्रांतील योग्य सुधारणांनी वाढवू शकलो तर आपण उत्पादनखर्च कमी करू शकू. तसेच अद्याप आपणास आपले व्यवस्थापनकौशल्य वाढवणे शक्य आहे. ह्यात कामगाराना उत्पादकता वाढवण्यासाठी प्रोत्साहन, कच्च्या मालाची साठवण व पुरवठा ह्यावर नियंत्रण, बाय् प्रॉडक्ट्स तसेच त्यांचा पुनश्च वापर, नवीन कच्च्या मालाचा पुरवठा वगैरेनी वस्तूंचे उत्पादनमूल्य कमी करता येणे शक्य आहे. जाहिरातीवर अनाठायी खर्च करण्याऐवजी वस्तूचे बाजार विक्री मूल्य कमी करणे भारतासारख्या विकसनशील देशात जास्त हितप्रद. नफा दोन प्रकारे मिळवता येतो. एक, कमी उत्पादन करून पण वस्तूचे विक्रीमूल्य दर युनिटमागे वाढवून किंवा उत्पादन वाढवून दर युनिट मागे किंमत कमी करून व कमी वाढावा घेऊन. त्यामुळे रोजगार वाढेल. रोजी वाढेल व मागणी वाढेल व त्यामुळे उत्पादनवाढीला चालना मिळेल. आजच्या मंदीच्या परिस्थितीत हाच पर्याय जास्त हितप्रद. गेल्या काही वर्षात भारत ग्रामीण विकासाच्या अनेक योजना राबवत आहे. ते योग्यच आहे. शेतीबाबत महात्मा गांधी म्हणत, शेती म्हणजे कधीही दगा न देणारा उद्योग तसेच ग्रामीण उद्योगाकडे केवळ अनुत्पादक उद्योग म्हणून न पाहता, शेती व ग्रामोद्योग ह्याकडे मागणीचा उगम व स्रोत म्हणून पाहिले म्हणजे त्यांचे महत्त्व कळून येते. एकूण उद्योगाकडे Intergrated म्हणजे समग्र दृष्टीने पाहिले पाहिजे. ते महालनोबीस मॉडेलमध्ये आढळते. लहान, मध्यम व मोठ्या उद्योगांना विशेष स्थान आहे. हा स्रोतच जर आटला तर मोठ्या उद्योगालाही त्याचे परिणाम भोगावे लागतील. म्हणून आपल्या दृष्टिकोनात फरक हवा. ज्याला आपण आज Small man– दुर्बळ क्रयशक्ती असलेला समजतो त्याची संख्या प्रचंड आहे व त्यांची एकत्रित मागणी ज्याला big man- जास्त क्रयशक्तिधारक समजतो, त्यापेक्षा अनेक पटींनी मोठी आहे. तिच्याकडे लक्ष दिले गेल्यास आर्थिक विकास निरंतर राहील. हाच धडा ह्या जागतिक पेचप्रसंगातून मिळतो. महात्मा गांधी समाजातील लहान व दुर्बळ घटकाला का असामान्य महत्त्व देत होते त्याचे मर्म आज कळून येते. पहिल्या महायुद्धानंतर जेत्या राष्ट्रांनी पराजित राष्ट्रांवर जबरदस्त खंडणी लादली तेव्हा किन्सने त्याला विरोध केला व सांगितले की हे कृत्य स्व:च्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे आहे. लोकाना ते नंतर पटले. आज भारतात आपणही ग्रामीण क्षेत्रातील छोट्या ग्रामउद्योगाकडे व शेतीकडे दुर्लक्ष केल्यास एकूण अर्थव्यवस्थाच धोक्यात येईल. एवढे जरी आपण लक्षात ठेवले तरी आपण परिस्थितीवर मात करू शकू.

**यशवंत अ. पंडितराव**
१३, हिरकरी, पहिला मजला,
पांडुरंग वाडी, तिसरी गल्ली,
गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३

# सतीश आळेकर 'लेखक-दिग्दर्शक'युगाचे प्रणेते

राजीव जोशी

मराठी रंगभूमीवर नवीन वळणे आणणारा प्रायोगिक नाटककार म्हणून सतीश आळेकर अपल्याला परिचित आहेत. तशी प्रायोगिक नाटकांची परंपरा विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार, गो.पु.देशपांडे, रत्नाकर मत्करी, अच्युत वझे अशा नाटकारांनी जोपासली. त्याच्या पुढच्या पिढीत शफाअतखान, प्रेमानंद गज्वी, प्रशांत दळवी, चेतन दातार, पुरु बेर्डे, रघुवीर कुल, शेखर ताम्हाणे, दिलीप जगताप, दिलीप परदेसी, चं.प्र.देशपांडे अशा नाटकारांनी आपआपल्या शैलीने हा प्रकार फुलवला. ह्यात सहित्यिक-नाटककार श्याम मनोहर-त्यांच्या यकृत, येळकोट, दृश्य नाटकांना आवर्जून घ्यावे लागेल.

रंगभूमीवरील नाटककार-दिग्दर्शक असे वेगळे कप्पे.

संगीत रंगभूमीचा त्या नाटकांचा विचार करता असे लक्षात येते की नाटककार नाटक लिहून द्यायचा आणि पुढे तालीममास्तर-दिग्दर्शक बसवायचा. हीच प्रथा-परंपरा थेट राम गणेश गडकरी, वसंत कानेटकर आणि तात्यासाहेब शिरवाडकर या दिग्गज नाटककारांनी पुढे चालू ठेवली. उल्लेख करायचा झाला तर गडकरी व कानेटकरांची रंगभूमीच्या अवकाशाबाबतची जाणीव पक्की होती. विशेषतः कानेटकारांची तंत्रावर हुकूमत होती.

त्यानंतर आपल्याला नाटक-माध्यमावर कमांड असलेले आणि त्याद्वारे वेगवेगळे प्रयोग करणारे नाटककार म्हणून विजय तेंडुलकरांचे नाव घ्यावे लागेल. त्यांनी लिहिलेल्या नभोनाटकातुन किंवा अजगर-मादीसारख्या एकांकिकांतून हे प्रयोगशीलत्व ठळकपणे जाणवते. त्यांनी अल्पशब्दातील संवादांतून नेमके नाट्य फुलवले, संघर्षबिंदूपर्यंतचा प्रवास, प्रत्येक व्यक्तिरेखेची वैशिष्टचे जपत त्यांच्या नाटकाशी साधलेला समांतर समतोल हा त्यांच्यातील सृजनशील, प्रायोगिक नाटकाराची प्रचिती तर देतोच, पण त्यात त्यांच्यातील दिग्दर्शकही डोकावतो. अनेकदा उल्लेख केलेली वस्तुस्थिती अशी की तेंडुलकरांच्या नाटकातील कंस हे शब्दांपेक्षा अधिक असतात. कंसातील रंगसूचना दिग्दर्शकाला नाटक बसवण्यासाठी योग्य मार्गदर्शन करत असतात. किंबहुना, तेंडुलकरांचे नाटक बसवताना कोणत्याही दिग्दर्शकाला (मग तो मान्यवर असो की नवोदित) तेंडुलकरीय सुचनांचा मागोवा घेत घेतच नाटक बसवावे लागते. तेंडुलकरांनी आखलेल्या चौकटीतच दिग्दर्शकीय प्रतिभेला खुलावे लागते. अर्थात तेही एक आव्हानच असते. कारण दिग्दर्शकीय संकल्पना गृहीत धरून लिहिलेल्या नाटकात दिग्दर्शकाला त्यापलीकडे जाऊन बसवण्याची कामगिरी करायची असते. वरकरणी सोपे वाटले तरी ते काम अवघड असल्याचे जाणवते. तेंडुलकरी नाट्यसंहितेमध्ये दोन वाक्यांमधील अर्थ बाहेर काढून प्रेक्षकांपर्यंत 'आशय' पोचवणे हे एक क्रिएटिव्ह चॅलेंजच होते. बाकीच्या नाटककारांच्या बाबतीत त्यांना तंत्र माहीत नसणे किंवा त्यात पारंगत नसल्यामुळे जी कमतरता असायची त्यामुळे त्यांच्या संहितांवर दिग्दर्शकांना खूप काम-सोपस्कार-संस्कार करावे लागायचे. कारण अनेक नाटककार हे आधीचे किंवा मूळचे पत्रकार किंवा साहित्यिक अधिक प्रमाणात असायचे. त्यातूनच दिग्दर्शकाला रंगमंचीय रंगावृत्ती तयार करायला लागायची, अपवाद म्हणून रत्नाकर मतकरी, दिलीप परदेशी अशा नाटककरांचा उल्लेख करावा लागेल. बाकी शफाअत, प्रेमानंद, प्रशांत दळवी यांनी स्पर्धा-प्रायोगिक स्तरावर भरपूर काम केल्याने त्यांच्या लिखाणात-संहितेत रंगभूमीच्या तंत्राची-विविध खात्यांची- प्रकाशयोजना, नेपथ्य, पार्श्वसंगीत ह्यांची जाणीव ठेवूनच 'लेखन' केल्याचे जाणवते. पुरु बेर्डेसारख्याचा तर सन्माननीय अपवाद म्हणावा लागेल. कारण लेखन, दिग्दर्शन, नेपथ्य, संगीत अशा चतुरस्त्र भुमिकांतून त्यांनी आपल्या व इतरांच्या नाटकांकडे पाहिलेले आहे.

तेंडुलकरांच्या बाबतीत सांगण्याचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे त्यांना रंगभुमीच्या शास्त्राचे आकलन होत, त्यांनी वेगवेगळे फार्म हाताळले होते. प्रयोगशीलता लेखनात सातत्याने जपली. परंतु त्यांनी कधी 'दिग्दर्शक' बनण्याचा प्रयत्न केला नाही. स्वतःचे नाटक मीच बसवणार! ते मलाच अधिक कळेल, त्यामुळे मीच ते अधिक चांगल्याप्रकारे बसवू शकेन असे त्यांनी कधीच केले नाही. लिखीत संहितेचे रंगमंचीय सादरीकरण्याबाबतीत दिग्दर्शक हा खरेतर 'कर्णधार'-पुढची सगळी सूत्रे त्याच्याच हातात असतात. नाटककाराने नाटक लिहून दिल्यानंतर सर्वार्थाने नाटककाराचे काम संपते. एकवेळा दिग्दर्शक त्याच्याकडून पुनर्लेखन करून घेऊ शकतो, पण नाटककार दिग्दर्शकाच्या कामात, अधिकारात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप वा ढवळाढवळ

करू शकत नाही. अगदीच वाटले तर रंगीत तालमीच्या दिवशी आपल्याला काय वाटले ते सांगू शकतो (दिग्दर्शकाने त्यानुसार काही बदल करावे असे बंधन दिग्दर्शकावर मुळीच नसते!) दिग्दर्शकाच्या हाती नाटक दिल्यावर तंत्राबाबत, व्यक्तीरेखाबाबतचे सर्व अधिकार त्याच्यापाशीच असतात. तेंडुलकरांना कधी असे अधिकार आपल्याकडे घ्यावेसे वाटले नाहीत. लेखनात दिलेल्या दिग्दर्शकीय सुचनांवरच ते थांबायचे.

रत्नाकर मतकरींनी स्वतःची नाटके इतर दिग्दर्शकांकडे दिली. मात्र काही नाटके स्वतः दिग्दर्शित केली. कारण एकतर हौशी-प्रायोगिक व स्पर्धेतील-स्वतःच्या संस्थेतील नाटके ते स्वतःच बसवत होते. तरी त्यांचा कल स्वतः दिग्दर्शन न करण्याकडेच होता.

या सगळ्या नाटककारांमध्ये सतीश आळेकरांनी 'दिग्दर्शक' म्हणून आपली नाटके आपणच बसवण्याचा शिरस्ता ठेवला. (अपवादात्मक 'महापूर' मोहन गोखलेंनी दिग्दर्शित केले होते!) इन फॅक्ट अनेक एकांकिकानाटकांमध्ये त्यांनी भूमिकाही केली (लेखन,दिग्दर्शन व अभिनय-तिहेरी भूमिका.) स्वतःची संहिता बसवण्यासाठी तिला इतरांपेक्षा स्वतःच अधिक न्याय देऊ शकतो, आशय नेमकेपणाने व्यक्त करू शकतो अशा प्रकारची त्यांची मनोभूमिका असावी. त्यांच्या एकांकिका व नाटकातील दृश्यात्मकता, आशय व आकृतिबंध हे आजवरच्या चौकटीतल्या नाट्यपरंपरेला छेद देणारे. त्यामुळे आळेकरी शैली उदयाला आली. त्यात व्यावसायिक दृष्टिकोन नव्हता, सोय होती व स्वयंस्फूर्त गरज होती. मात्र त्यांची नाटकं व्यावसायिक झाली ती इतरांच्या दिग्दर्शनात.

मात्र त्यातून एक क्लिअर झाले की आधीच रंगमंचीय शक्यतांचा विचार करून लिहिलेल्या स्क्रीप्टचे, दिग्दर्शक म्हणून सादरीकरण करताना ते अधिक शार्प होते. दुसऱ्या दिग्दर्शकाने त्यातील अर्थ काढणे, प्रत्येक प्रसंगाचा उत्कर्षबिंदू साधणे आणि नाटकाराचा आशय डिट्टो पध्दतीने किंवा त्यापेक्षा वरच्या स्तरावर पोचवणे या व अशा अनेक शक्यतांचा विचार होऊ शकतो. पण आळेकर आपल्याच शैलीत आपण मांडलेली संकल्पना लेखन ते सादरीकरण या टप्प्यांत अभिव्यक्त करण्यासाठी लेखनाबरोबरीने दिग्दर्शन करण्याचा आग्रह धरत असावेत. तेही काही गैर नाही. कारण मूळात 'आळेकरी शैली' इतकी प्रवाही, लवचिक आहे ती त्याच पध्दतीत व्यक्त झाली तरच बहार येते, प्रेक्षकांपर्यंत समर्पकपणे पोचते. इतर दिग्दर्शक ती शैली अगदी शंभर टक्के तशीच्या तशी नाही, तरी स्वतंत्र प्रमिभेने मांडू शकतो. विजया मेहता, वामन केंद्रे तसेच ललित कलामधील तेव्हाचा विद्यार्थी-दिग्दर्शक सतीश मनवर या दिग्दर्शकांनी सतीश आळेकरांच्या नाटकांना आपल्या पध्दतीने न्याय दिला होता. तरी ओव्हरऑल निष्कर्ष काढायचा झाला तर आळेकरांची नाटके ही त्यांनी स्वतःच दिग्दर्शित केली आहेत. 'अतिरेकी'सारखे एखादेच नाटक गिरीश जोशीने बसवले होते.

आळेकरांपासून हा एक प्रघात सुरू झाला असे वाटते. कारण तोपर्यंतच्या नाटककारांनी स्वतःची नाटके स्वतः बसवणे टाळले. कारणे काहीही असतील, पण अन्य दिग्दर्शकांकडे आपल्या संहिता सोपवल्या. आळेकरांनी निग्रहाने लेखन-दिग्दर्शन स्वतःकडे घेतले. पुढे, आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमधून आळेकरांची छाप असलेले अनेक नवनवे लेखक जन्माला आले, त्यांच्यापैकी बहुतेकांनी आपली संहिता आपणच दिग्दर्शित करणे पसंत केले. त्यापैकी महत्त्वाची नावे म्हणजे देवेंद्र पेम, केदार शिंदे आणि संतोष पवार. या तरुण रंगकर्मींनी स्पर्धेतील एकांकिका सादर करण्यापासूनच हा ट्रेण्ड सुरू केला व पुढे व्यासायिक म्हणून स्थिर झाल्यावरदेखील चालू ठेवला. आनंद म्हसवेकर, किरण पोत्रेकर, गिरीश जोशी व विजय निकम यांनी देखील ह्याच पठडीतून स्वतःची नाटके दिग्दर्शित केली. डॉ.विवेक बेल्ले, डॉ.चंद्रशेखर फणसळकर, शेखर ताम्हाणे, वामन तावडे, शफाअतखान, प्रशांत दळवी, प्रेमानंद गज्वी, अभिराम भडकमकर या तरुण नाटककारांनी मात्र इतर दिग्दर्शकांकडेच आपली नाटके सोपवली. स्वतःला तंत्र-मंत्र अवगत असूनही दिग्दर्शन करण्याचा आग्रह धरला नाही.

दुसऱ्या बाजूला, लेखक-दिग्दर्शकाची जोडी उत्तम ट्युनिंग वा अंड्रस्टँडिंग असल्याप्रमाणे एकत्र काम करताना दिसते आहे. प्रशांत दळवी, चंद्रकांत कुळकर्णी ही या कॅटेगरीतली सर्वात टॉपची जोडी. प्रशांतचे नाटक दुसऱ्या दिग्दर्शकाने बसवयाचे ऐकिवात, पाहण्यात तरी नाही. चंदूने मात्र डॉ.अजित दळवी, अभिराम भडकमकर अशा अन्य नाटककारांची नाटके दिग्दर्शित केली. पण ठसा उमटवला किंवा सर्वाधिक दिग्दर्शन केले ते प्रशांत दळवीच्या नाटकांचेच. इरावती कर्णिक-अद्वैत दादरकर, जयंत पवार-मंगेश कदम, सुदेश जयराम- प्रकाश बुद्धिसागर, जयवंत दळवी-विजया मेहता, तेंडुलकर- कमलाकर सारंग, रत्नाकर मतकरी-विजय केंकरे, प्र.ल.मयेकर-दिलीप कोल्हटकर, आनंद म्हसवेकर-विजय गोखले, प्र.ल.मयेकर-विनय आपटे, डॉ.समीर कुलकर्णी-प्रतिमा कुलकर्णी, महेश एलकुंचवार-विजया मेहता, शं.ना.नवरे-रमेश चौधरी, शं.ना.नवरे-नंदकुमार रावते ह्या व अनेक जोड्या यशस्वी म्हणून लोकमान्य झालेल्या आहेत.

संजय मोनेंनी- मनोहर काटदरेंचे 'आपलं बुवा असं आहे!' हे एकेकाळी गाजलेले नाटक पुनर्लेखन करून-दिग्दर्शित केले- हम तो तेरे आशिक है! ते केवळ 'रिमेक' नव्हते. त्यात त्याने स्वतःचे कथाबीज आणि चुरचुरीत चटपटीत संवादांची फोडणी दिली होती. असे नाटक दुसऱ्याकडे दिग्दर्शनासाठी देण्यापेक्षा स्वतःच केल्यावर प्रसंग किंवा संवादातील-दिग्दर्शकीय बदल करणे सोपे जाते. नट म्हणून सूत्रधाराची भूमिका करतानाही लवचिकतेचा फायदा मिळतो.

एकच नाटक स्वत: लेखकाने आणि त्याचबरोबरीने दिग्दर्शकाने करण्याचा पराक्रम-'सोफा कम् बेड' या पूर्वीच्या प्रायोगिक नाटकाच्या बाबतीत घडला होता. ते पं.सत्यदेव दुबेंनी केले आणि अच्युत वझेंनीही बसवले होते. सुरेख खरे, अशोक समेळ, अरविंद औंधे या नाटककारांनी आपली स्वतःची नाटके स्वतःच बसवलेली आहेत.

अशोक पाटोळे, अभिराम भडकमकर या नाटककारांना लेखनाच्या बरोबरीने अभिनय करण्याचा मोह मात्र होतो, तितका दिग्दर्शन करण्याचा होत नाही.

दिग्दर्शक असताना नाटकाकर होण्याचा मान फार क्वचित जणांना मिळालेला आहे. उदाहरणार्थ, गुजराथी रंगभूमीवरील अरविंद ठक्कर. निर्माते मोहन वाघांनी लेखन-दिग्दर्शनाचा अनुभव घेतलेला आहे. प्रा. मधुकर तोरडमल यांनीही लेखन, दिग्दर्शन आणि अभिनय या तिन्ही भूमिका समर्थपणे निभावल्या आहेत. तसेच, एकपात्री प्रयोग करणाऱ्या कलाकारांनी लेखन-दिग्दर्शन, अभिनय असे सर्व स्वतःच केलेले आहे.

व्यावसायिक ट्रेण्ड

'पेम-शिंदे-पवार' या त्रयीने स्वत:ची नाटके स्वतःच दिग्दर्शित करून लोकप्रियता व यशस्वीपणाची मोहर उमटवली. त्याचा फायदा असा झाला की ते नाट्यसंहितांच्या-बाबतीत अन्य दिग्दर्शकांवर अवलंबून राहिले नाहीत. कारण अन्य दिग्दर्शकाला संहिता पटणे, त्यात त्याच्या मार्गाने बदल करणे आणि सादर करणे हे झंझट उरलेच नाही. कलात्मक तसेच व्यावहारिक पातळीवर हे 'टू-इन-वन' असणे खूप सोयीस्कर ठरलेले आहे. निर्मात्यांनासुद्धा हे असे असणे सोयीचे वाटते. त्यामुळे तर हा ट्रेण्ड अधिक वेगाने सेटल झालेला दिसतो. एकतर दुसऱ्यांवर अवलंबून राहण्याची गरज राहत नाही आणि यश किंवा अपयशाची जबाबदारी सर्वस्वी एकट्याची असते.

फायदे-तोटे

स्वत:ची संहिता-दिग्दर्शित केल्याने लिखाणातील त्रुटींवर दिग्दर्शकीय कामाने मात करता येते. वेगवेगळे विषय-फॉर्म हाताळता येतात. तोच कलाकारसंच मिळाल्यास, त्यांच्या बलस्थानांचा उपयोग करून प्रयोग-सादरीकरण अधिक सशक्त करता येते. एखादी भन्नाट कल्पना- दुसऱ्याला पटणे आणि त्यानेही ती प्रत्यक्षात उतरवणे ह्याला लिमीटेशन्स असू शकतात. स्वत: मात्र ती आपल्या सोयीने, तंत्राने विकसीत करू शकतो. हे काम स्वत:च दिग्दर्शन केल्याने सहजशक्य होऊ शकते. इतरांचे विषय, फॉर्म हाताळायची संधी मात्र मिळू शकत नाही. कारण आपले तेच आपल्याला योग्य वाटल्यावर इतरांकडे 'नाटक' मागण्याचा प्रश्न कुठे येतो? त्यामुळे आपण टाईपकास्ट-तोच तोपणा करतोय असा शिक्का बसू शकतो. सृजनात्मक प्रवासाला मर्यादा येऊ शकते आणि आज जरी व्यावसायिक यश मिळत असले, तरी त्याने पाठ फिरवल्यावर पुढील व्यावसायिक संधी मिळणे कमी होऊ शकते. म्हणून संतोष पवारसारखा इतर लेखकांची अगदी आचार्य अत्र्यांपासूनच्या नाटककारांची नाटके करण्याचा आणि त्याद्वारे आपल्याच लिखाणावर अवलंबून न राहता, दुसऱ्यांच्या संहिता साकारण्याचे आव्हान स्वीकारत पुढे जातो आहे. व्यावसायिक धोरण म्हणून आणि कलात्मक विकासासाठी स्वतःच्या लेखन-दिग्दर्शनापलीकडे पाहणे हे केव्हाही व्यवहार्य म्हणता येईल.

'नाटक' हे सृजनात्मक माध्यम असल्याने तिथे अमुकाने अमुकच करावे असा काही बंदिस्त नियम घातला जाऊ नये. लेखक-दिग्दर्शक एक असू दे किंवा भिन्न त्यातून वेगळे, नवे आणि नाट्यचळवळीला पुढे नेणारे काही घडावे ही एक अपेक्षा आहे. एक नाटक लिहिण्यासाठी आता एकच नाटककार असेल असेही नाही. संकल्पना एकाची आणि ती दुसऱ्याच नाटककाराने विकसित केलेली असू शकते. दोन नाटककारांनी एकत्र लिहिलेले 'नाटक'ही उभे राहते की सिनेमामध्ये दिग्दर्शक हा पटकथेच्या बांधणीत जरूर सहभागी होतो, त्याचप्रमाणे आज रंगभूमीवर 'दिग्दर्शक' या घटकाचे महत्त्व वाढल्याने त्याचे सहभागी होणे किंवा स्वतःची संकल्पना त्यानेच दिग्दर्शित करणे स्वाभाविकच आहे.

काही दशकांपूर्वीची रंगभूमी ही नाटककारांची होती आता ती दिग्दर्शकाच्या हाती गेलेली आहे. त्यामुळेच आळेकरांना आपली संहिता आपण दिग्दर्शित करावी असे वाटणे हे बट नॅचरल आहे. कारण नाटक हे सादर करण्याचे माध्यम असल्याने नाटककार म्हणून लिहिलेली संहिता अल्टीमेटली - Perform करायची असल्याने, ती इतरांकडे सोपवण्यापेक्षा स्वत: अधिक सशक्तपणे, सृजनशीलतेने सादर करावी.

एक मात्र नक्की की आळेकर या नव्या ट्रेण्डचे अध्वर्यू आहेत. नाटककार म्हणून त्यांनी नवी वाट तयार केली आणि लेखक-दिग्दर्शकाचा महामार्गच तयार केला!

**राजीव जोशी**
एच/४९८, पाचवा मजला,
रिझर्व्ह बँक कॉलनी, मराठा मंदिरच्या
मागे, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८

**'रुची' संबंधीचे प्रकटन**

संपादक, मुद्रक, प्रकाशक
**दिनकर गांगल**
चिटणीस, ग्रंथाली विश्वस्त संस्था
राष्ट्रीयत्व - भारतीय
पत्ता : इंडियन एज्युकेशन सोसायटीची
म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०२८
दूरध्वनी : २४४७ ४८ ४३
प्रसिद्धीचा नियतकाल
दर महिन्याला, १० तारीख

**प्रकाशन स्थळ**
इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले
कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर,
मुंबई - ४०० ०२८
दूरध्वनी : २४४७ ४८ ४३

# द क्युरियस केस ऑफ 'स्लमडॉग मिलीनेयर'

## धनंजय गांगल

'स्लमडॉग मिलीनेयर'च्या (SM) पहिल्या दृश्यात एक कार्ड दिसते - जमाल मलिक हा वीस मिलीयन रुपयांपासून फक्त एक प्रश्न दूर आहे. इथपर्यंत तो कसा पोचला? चार संभाव्य उत्तरे आहेत, अ. त्याने फसवलेय, ब. तो नशिबवान आहे, क. तो बुद्धिमान आहे आणि ड. हे विधीलिखित आहे. सिनेमाच्या शेवटी याचे उत्तर मिळते.

साधरण तीस वर्षांपूर्वी अॅटेनबरोच्या 'गांधी'ला SM एवढेच यश मिळाले होते. असेच वेगवेगळे दर्जेदार आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाले होते. 'गांधी'बद्दल सरसकट सगळ्यांनाच आनंद झाला, तर SM वर आपल्याकडे परस्परविरुद्ध प्रतिक्रिया उमटल्या.

चित्रपटाचा नायक 'जमाल' (देव पटेल) साधारण विशीतील तरुण. चित्रपटाची सुरुवात होते तेव्हा हा नायक 'कौन बनेगा करोडपती' या शोच्या शेवटच्या प्रश्नापर्यंत पोचला आहे.

शेवटचा प्रश्न विचारण्याआधीच एपिसोडची वेळ संपल्याने तो प्रश्न उद्याच्या एपिसोडमध्ये घडणार आहे. तो शेवटचा प्रश्न आणि त्याच्यामध्ये काही तासच शिल्लक आहेत. पण त्याहून एक मोठी दरी त्याला पार करावी लागणार आहे. ती म्हणजे श्रीमंत-गरीब यातील दरी! 'जमाल' हा रूढ अर्थाने सुशिक्षित नाही. तो अत्यंत गरिबीत हातावर पोट घेऊन, झोपडपट्टीत वाढलेला मुलगा आहे. आई-बाप लहानपणीच वारलेत. सध्या तो एक 'चायवाला पोऱ्या' आहे. असा हा 'स्लमडॉग' एकापेक्षा एक कठीण प्रश्नांना उत्तरे देत इथपर्यंत पोचला कसा? हे एवढे ज्ञान त्याला कोठून आले? की काही फसवणूक आहे? असा प्रश्न लोकांना पडलाय. तसा तो प्रश्नकर्ता प्रेम कुमार (अनिल कपूर) यालाही पडलाय. याच शंकेने जमालची पोलीस स्टेशन मध्ये रवानगी होते. पोलीस इन्स्पेक्टरकडे (इरफान खान) जमाल कबूल करतो, की आपल्याला खऱ्या अर्थाने त्या प्रश्नांची उत्तरे माहीत नव्हती. पण प्रत्येक प्रश्नाने आयुष्यातील कुठल्या ना कुठल्या प्रसंगाची आठवण करून दिली आणि त्यावरून आपल्याला उत्तरे मिळत गेली. असा प्रत्येक प्रश्न आणि त्यानिमित्ताने उलगडत जाणारे त्याचे आयुष्य, अशा पद्धतीने चित्रपट पुढे जातो. त्यात काही अंगावर काटे आणणारे प्रसंग आहेत. त्यात त्याचा लहानपणीचा मित्र अरविंद याचे झोपडपट्टीदादाने डोळे काढून भिक मागायला लावण्याचा प्रसंग आहे. आपल्या लाडक्या 'अमिताभ'ची सही मिळवण्यासाठी 'मनुष्य-विष्ठेत' उडी मारण्याचा प्रसंग आहे. हिंदू-मुस्लिम दंगे आहेत. त्याचा मोठा भाऊ सलीम आणि त्याची बालमैत्रीण लतिका आहे. त्यांनी जगण्यासाठी केलेली धडपड आहे. 'जावेद' (महेश मांजेरकर) दादा बरोबरचा पंगा! लतिका बरोबर मिलने-बिछडने का खेल आहे. बराच काळ त्याला लतिकाचा ठावठिकाणा लागत नाही. ती जिथे कुठे असेल तिथे 'कौन बनेगा...' नक्की बघत असणार या विश्वासाने तो या टी.व्ही. शो-मध्ये भाग घेतो. त्याचा हा खटाटोप पैशांसाठी नसून तिच्यासाठी हे समजल्यावर इन्स्पेक्टर त्याला सोडून देतो आणि जमाल पुढच्या एपिसोडमध्ये शेवटच्या प्रश्नाचे उत्तर द्यायला हजर होतो!

दुसरीकडे, त्याचा मोठा भाऊ सलीमही जमालची लतिकाला भेटायची धडपड आणि त्याचे 'कौन बनेगा...' मधील यश बघून 'शेवटचा निर्णय' घ्यायची हीच वेळ आहे, हे समजून जातो. तो लतिकाला आपली गाडी आणि सेलफोन देऊन जावेदपासून दूर पळून जायला सांगतो. इकडे एपिसोडमध्ये शेवटचा प्रश्न 'तीन मस्किटीयरस्' या कथेच्या एका पात्राच्या नावाबद्दल आहे. जमालला उत्तर माहीत नाही. तो लाइफलाइन 'फोन-अ-फ्रेंड' फिरवतो तो सलीमला. पण सलीमचा सेलफोन आता आहे नेमका लतिकाकडे. लतिका फोन घेते. तिलाही उत्तर माहीत नाही पण फोन ठेवण्याच्या आधी ती त्याला सांगते, 'आय एम यूवर्स.' यावरून तो प्रश्नाचे उत्तर ओळखतो. तो गेम शो जिंकतो. लतिकाही त्याला मिळते आणि रेल्वे स्टेशनवरील बॉलिवूड स्टाईल गाण्याने सिनेमाचा गोड शेवट होतो.

सिनेमाच्या सुरुवातीला विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर आता मिळते, हे विधीलिखित होते.

सिनेमाची कथा विकास स्वरूप यांच्या 'क्यू अँड ए' या कादंबरीवर आधारित आहे. सायमन ब्युफॉय यांनी सिनेमाची पटकथा लिहिली आहे. पटकथेसाठी मूळ कथेत बरेच बदल केले आहेत. मूळ पुस्तकात जमालचे नाव आहे, 'राम मोहम्मद थॉमस'. हा तद्दन भारतीय सर्वधर्मसमभाव पाश्चात्त्यांना समजला आणि रुचला नसता. मूळ पुस्तकात हिंदू-

**आंतरराष्ट्रीय सौंदर्यप्रसाधने भारतात पॉप्युलर करायची असे ठरल्यावर सलग तीन-चार वर्षे भारतीय तरुणींना विश्वसुंदरीपद मिळू लागले. मग अचानक प्रकाशझोत दुसरीकडे गेला. ए.आर. रेहमान हा असाच आपल्याकडचा ओव्हर-हाइपड् संगीतकार! त्याला संगीताची दोन्ही बक्षिसे देऊन हॉलिवूड कुठली बाजारपेठ काबीज करू बघतेय ते वेगळे सांगायला नको.**

मुस्लिम दंगल नाही. मूळ कथेत थॉमसला एक पाद्री सांभाळतो. दुसरा एक पाद्री रामवर अती प्रसंगही करतो. ते अर्थात पटकथेत नाही. लतिकाचे नाव मूळ पुस्तकात नेहा असे आहे. त्यांचे नाते मूळ कथेपेक्षा सिमेनात जास्त उत्कट आहे. एकूणच सिनेमाची राजकीय, धार्मिक आणि वर्गीय मांडणी सद्य परिस्थितीनुरूप 'पॉलिटिकली करेक्ट' आहे.

सिनेमाचे दिग्दर्शन केले आहे डॅनी बाईल या ब्रिटिश दिग्दर्शकाने. या सिनेमाच्या पाठी वितरणासाठी भक्कमपणे उभे आहेत वार्नर ब्रदर्स आणि फॉक्स. डॅनी बाईलने सिनेमाची गती वेगवान ठेवली आहे. एकेक प्रसंगही क्लोज, मिड, लाँग शॉट्सच्या सरमिसळीने बांधला आहे. फारसा विचार करायला तो वेळच देत नाही. पहिल्या प्रथम बघताना खूप काहीतरी चालले आहे असा भास होतो. बऱ्याच वेळा कॅमेऱ्याचे अँगलही चित्रविचित्र आणि क्षणभर प्रेक्षकाला गोंधळवून टाकणारे आहेत. अशी पद्धत पंकज पराशरने 'करमचंद' या टी.व्ही. मालिकेत वापरली होती. अंगावर शहारे आणणारे प्रसंग चित्रित करणे त्याला विशेष आवडते. असेच बोलबाला झालेले दोन-तीन प्रसंग- एकात मुलांना भीक मागायला लावणाऱ्या झोपडपट्टीदादाने एका मुलाचे डोळे काढण्याचा प्रसंग आहे. तर दुसऱ्या एका प्रसंगात आपल्या लाडक्या अमिताभला भेटण्यासाठी काही 'अपरिहार्य' कारणामुळे छोटा जमाल चक्क मनुष्याच्या विष्ठेत स्वत:ला बरबटून घेतो! हे प्रसंग त्या त्या क्षणी प्रेक्षकांच्या अंगावर येतात.

डॅनी बॉईलचे याआधीचे चित्रपट आहेत, 'रॉलो ग्रेव्ह', 'ट्रेनस्पॉटींग', २८ डेज लॅटर', 'सनसाइन'. SM मधल्या अनेक प्रसंगाचे नाते तुम्ही या त्याच्या आधीच्या सिनेमांशी जोडू शकता. किंबहुना ती त्याची अशी स्वतंत्र शैली आहे. हे अंगावर येणारे प्रसंग, दुसरीकडे झिरो ते हिरो म्हणजे स्लमडॉग ते मिलीनेयर आणि तिसरीकडे जमाल-लतिकाची उत्कट प्रेमकहाणी असे तीन पदर पटकथाकाराने आणि दिग्दर्शकाने बेमालून गुंफले आहेत. अनेक चित्रविचित्र कटू प्रसंग आपल्याला खुर्चीला खेळवून ठेवतात. चित्रपट संपल्यावर काही काळ मनात रेंगाळतात. पण नंतर चित्रपटातून कुठलेच सूत्र गवसत नसल्याचे ध्यानात येते. लेखक-दिग्दर्शकाला नक्की म्हणायचेय काय? किंवा तशी इच्छा तरी आहे का? हे उमगत नाही.

सभोवतालचे कटू सत्य ते आरशा-प्रमाणे स्वच्छ तुमच्यासमोर मांडतात. मग तुमच्या 'अजेंडा'प्रमाणे तुम्ही त्यात स्वत:ला दिसता आणि हरखून जाता. चित्रपटाचे यश ह्या करामतीत आहे. पण कालांतराने ही क्लृप्ती तुम्हाला लक्षात येते. त्यामुळे या सिनेमाला रिपीट ऑडीयन्स विशेष नाही. किंबहुना अजून दोन-एक महिन्यांत तो कायमचा विस्मृतीत जाईल, पण गेले दोन-एक महिने मात्र तो आपल्या माध्यमांमध्ये 'छाया' हुआ होता.

साधारण ऑक्टोबर ०८ मध्ये अमेरिकेत प्रदर्शित झालेला सिमेना आपल्या-कडे अचानक चर्चेत आला तो 'गोल्डन ग्लोब' मिळाल्यावर. गेल्या दोन महिन्यात त्याला 'बाफ्टा', 'ब्रिटिश इन्डिपेंटंट', 'ब्लॅकरील', 'आर्ट गिल्ड' अशी अनेक बक्षिसे मिळाली आहेत.

पण या सगळ्यावर कळस चढला तो अ‍ॅकॅडमी किंवा आपण ज्याला ऑस्कर संबोधतो त्या अ‍ॅवॉर्डने. स्लमडॉगला एकूण आठ ऑस्कर मिळाली. उत्कृष्ट चित्रपट – क्रिस्टन कॉलसन, दिग्दर्शन – डॅनी बाईल, उत्कृष्ट पटकथा – सिमॉन ब्युफॉय, चित्रण – अँथोनी मॅनटल, संकलन क्रिस डिकन्स आणि आपल्यासाठी कौतुकाची उर्वरित तीन म्हणजे संगीतासाठी रहमान, 'जय हो' या गाण्यासाठी – रहमान आणि गुलजार व तिसरे ध्वनियोजना हे इथॉन टॅप, रिचर्ड प्रायके आणि रसुल पुकुटी या तिघांना. यातील रसुल पुकुटी भारतीय आहेत.

थोडीशी बटबटीत, बॉलिवूडकडे झुकणारी रचना असलेला हा सिनेमा ऑस्करच्या पठडीत खरे तर बसत नाही. संयत, तरल, उत्कट आविष्कार ही ऑस्करची खासियत! ऑस्करच्या स्पर्धेत अजून दोन तगडे चित्रपट होते – सीन पेनचा 'मिल्क' हा समलैंगिकतेवर आधारीत तर 'द क्युरीयस केस ऑफ बेंजामीन बटन' हा ब्रॅड पीटचा वार्धक्यातून तारुण्याकडे प्रवास करणाऱ्या व्यक्तीचा! 'गे'ची समलैंगिकता आणि त्यांचे हक्क सध्या 'इन' टॉपिक असल्यामुळे त्याला ऑस्कर मिळेल अशी भावना होती. शिवाय तो खास अमेरिकन विषय! स्लमडॉग त्या अर्थाने 'एशियन'! पण माझ्या मते, 'बराक' इफेक्ट आणि 'इराक' युद्ध याने पारडे स्लमडॉगकडे झुकले असणार.

जमालमध्ये परीक्षकांनी बराकला पाहिले असणार. शिवाय, 'इराक' युद्धाने कुठेतरी अरब-मुस्लिमांवर अन्याय केलाय ही 'गिल्ट' असणार.

चित्रपटाचा बोलबाला चालू झाला मात्र आपल्याकडे दोन तट पडले. काहींना सिनेमा उत्कृष्ट (मॅग्निफिसंट) वाटला तर काहींना सुमार (मेडिऑकर). काहींनी

झोपडपट्टीतील जीवन दाखवण्यावरून आक्षेप घेतला, की भारतातील फक्त 'गरिबी'च दिसली का? दुसरे काहीच चांगले दिसले नाही? त्यावर, 'जे वास्तव आहे ते लपवण्यात कसली लाज?' असा प्रतिप्रश्न.

या निमित्ताने 'इंडियाना जोन्स अँड टेम्पल ऑफ डूम' या सिमेनाची आठवण झाली. हा चित्रपट एक फँटसी होती. त्यातले काही कथानक भारतात घडते. अजूनही भारतात राजे-रजवाडे, गारुडी, मांत्रिक इत्यादी असल्याचे थोडे अतिशोयक्त चित्रण होते. कुंभमेळे पाहिले तर तसे दृश्य आपल्यासमोर आजही उभे राहते. तरीही या चित्रपटावर भारताची बदनामी होते या कारणास्तव बंदी घातली होती. सुदैवाने या सिनेमाला ऑस्कर वगैरे मानाची कुठलीही विशेष पारितोषिके मिळाली नाहीत. नाहीतर धरले तर चावते आणि सोडले तर पळते अशी आपली अवस्था झाली असती!

स्लमडॉगला गोल्डन ग्लोब आणि ऑस्कर मिळाल्याचा उन्माद विशेषत: मीडियात अलोट होता. पाश्चिमात्य सापेक्ष एक प्रचंड न्यूनगंड आपल्या समाजात आणि विशेषत: एलाइटमध्ये आहे. त्यांनी कौतुक केल्यावर आपल्या अंगावर येणारे शहारे अवर्णनीय!

हा हॉलिवूड चित्रपट होता आणि हॉलिवूडचे ऑस्कर पारितोषिक त्याला मिळाले. हाच चित्रपट- जसाच्या तसा- भारतीय दिग्दर्शकाने बनवला असता तर त्याची विशेष दखलही घेतली गेली असती की नाही ही शंका आहे.

**धनंजय गांगल**
dhananjay.gangal@gmail.com

# दिवाळी अंक महास्पर्धा

## निकाल जाहीर

'ग्रंथाली' आणि 'स्टार माझा' यांनी संयुक्तरीत्या 'दिवाळी अंक महास्पर्धा' आयोजित केली होती. आठ विभाग आणि त्यांसाठी घसघशीत २४ पुरस्कार जाहीर करण्यामागे सर्व प्रकारच्या दिवाळी अंकांच्या सहभागाचा विचार होता. २००८ सालच्या दिवाळी अंकांच्या या स्पर्धेला केवळ महाराष्ट्रभरातूनच नव्हे तर परदेशातूनही उत्तम प्रतिसाद मिळाला. स्पर्धेसाठी आलेल्या अंकांचे विभागवार त्या त्या क्षेत्रांतील तज्ज्ञांकडून परीक्षण केले गेले. परीक्षक म्हणून रंजन जोशी, अवधूत परळकर, मीना वैशंपायन, मनोज आचार्य, नीरजा धुळेकर, डॉ. वसंत पाटणकर आणि धनंजय गांगल यांनी काम पाहिले. ग्रंथाली आयोजकांपैकी असल्यामुळे ग्रंथालीच्या रुची दिवाळी अंकाचा स्पर्धेत समावेश नव्हता. प्रत्येक विभागात तीन पारितोषिके देण्याचे ठरवले असले तरी अंकांची उपलब्धता आणि तज्ज्ञांच्या निवडीनुसार पारितोषिके जाहीर करत आहोत.

पुरस्कारप्राप्त विभागवार दिवाळी अंक असे -

**उत्कृष्ट दिवाळी अंक**

१. **सर्वसामान्य - कदंब** (प्रथम), **दीपावली** (द्वितीय), **इत्यादी** (तृतीय)

२. **विशिष्ट विषयाला वाहिलेले - शब्द** (प्रथम), **कथाश्री** (द्वितीय), **पुरुषस्पंदन** (तृतीय)

३. **मुंबई-ठाणे, पुणे-नाशिक सोडून उर्वरित महाराष्ट्रातून प्रकाशित होणारे - आशय** (प्रथम), **लोकमत** (द्वितीय), **तरुणभारत** - शब्द दरवळ (तृतीय)

शिवाय,

१. **मुखपृष्ठ-मांडणी - अभिधानंतर** (प्रथम), **मायमावशी** (द्वितीय), **ती** (तृतीय)

२. **व्यंगचित्रे - कालनिर्णय (प्रथम)** या विभागात फक्त एकाच अंकाची निवड झाली आहे.

३. **कथा-कादंबरी - मौज** (प्रथम), **उत्तम अनुवाद** (द्वितीय), **पुरुष उवाच** (तृतीय)

४. **कविता - मौज** (प्रथम), **अभिधानंतर** (द्वितीय) या विभागात दोन पारितोषिके दिली आहेत.


५. **अन्य लेख - साधना** (प्रथम), **कालनिर्णय** (द्वितीय), **अक्षर** (तृतीय)

**स्पर्शज्ञान (ब्रेल लिपीत), हितगुज (**Maayboli.com**), सावली (**NYJ**), रंगदीप (**NYJ**) या अंकांना विशेष पुरस्कार देण्यात येत आहेत.**

पुरस्कार समारंभाची आखणी होताच तारीख व स्थळ-वेळ जाहीर केले जाईल.

# शास्त्रोक्त समाजशिक्षण अनिवार्य

## – परिसंवादातील मत




विकास ही संकल्पना जाणिवांची जाणीव असलेल्यांसाठी आहे. ती मानवनिर्मित आणि मनुष्यकेंद्रित आहे. पण स्वातंत्र्योत्तर साठ वर्षांच्या काळात विकासाच्या अनुषंगाने कोणतीही सामाजिक मूल्ये आपल्याकडे रुजवली गेली नाहीत. त्यामुळे शास्त्रोक्त समाजशिक्षण अनिवार्य केले पाहिजे, असे मत व्यासपीठावरून विविध अभ्यासकांनी मांडले.

'ग्रंथाली'तर्फे सु.गो. तपस्वी लिखित 'विकासाची रूपरेषा- परिसंवादांच्या अनुभवांतून अर्थात तिसरा स्वातंत्र्यलढा' या पुस्तकाचे प्रकाशन पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख शरद देशपांडे यांच्या हस्ते झाले. 'सकाळ माध्यम समूहा'चे संचालक-संपादक आनंद आगाशे या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पत्रकार ज्ञानदा देशपांडे, लेखक सु.गो. तपस्वी हेही व्यासपीठावर उपस्थित होते. या प्रसंगी 'अफार्म'चे मुकुंद घारे आणि आदिवासींसाठी दीर्घकाळ कार्य करणाऱ्या शरद कुलकर्णी यांचा आगाशे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

मनोगतात तपस्वी म्हणाले, ''स्वातंत्र्योत्तर साठ वर्षांत सत्ताकांक्षी आणि सत्‌शक्ती असे दोन गट निर्माण झाले. सत्शक्तीचे सतत खच्चीकरण करण्याचा प्रयत्न सत्ताकांक्षींनी केला. प्रत्यक्षात, लोकशाहीसाठी सत्शक्तीने संघटित होऊन सत्ताकांक्षींवर अंकुश ठेवणे अपेक्षित होते. पण राजकीय, सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारी मूल्ये रुजवलीच न गेल्याने सामाजिक बांधीलकीची भावनाच लयाला गेली आहे. नागरी मूल्यांचा ऱ्हास झाला आहे. त्यासाठी शालेय शिक्षणातच शास्त्रोक्त समाजशिक्षण सक्तीचे केले पाहिजे.''

आनंद आगाशे म्हणाले, ''आताचा काळ 'इमेज बिल्डिंग'चा आहे. धर्म, जात, वंश, भाषा, संस्कृती, परंपरा, संस्कार.. असे परस्परांना छेद देणारे समाजगट सर्वत्र निर्माण झाले आहेत. त्यांच्यात अस्मिता, अस्तित्वाचे द्वंद्व उभे राहण्याची शक्यता आहे. सार्वजनिक ठिकाणी सरकार अनेक बाबींतून अंग काढून घेत असून खाजगीकरण, कॉर्पोरेट क्षेत्राचा प्रभाव वाढत आहे. परिणामी, सामाजिक प्रश्नांची सरमिसळ झाली आहे. तंत्रज्ञानाच्या विस्फोटामुळे नवी आव्हाने, समस्या उभ्या राहिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर समाजघटकांतील बधिरता टाळण्यासाठी नवी शोधयात्रा सुरू करावी लागेल.''

प्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ इमॅन्युएल कान्ट याने ज्याप्रमाणे 'मानवी बुद्धीची' (रीझन) मीमांसा करून मानवी बुद्धीची शक्ती आणि तिच्या मर्यादा स्पष्ट करणारे तीन ग्रंथ (ट्रिलॉजी) लिहिले त्याप्रमाणेच सुहास तपस्वी यांनी 'विकास' ही संकल्पना मध्यवर्ती ठेवून प्रस्तुतची ट्रिलॉजी लिहिलेली आहे अशी सुरुवात करून पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. शरद देशपांडे म्हणाले, ''तपस्वींनी केलेली निरीक्षणे व त्यावर आधारलेले त्यांचे चिंतन राजकीय धाटणीचे नसून समाजशास्त्र व व्यवस्थापन-शास्त्र ह्यांच्या अंगाने जाणारे आहे.

''विकास या संकल्पनेतील अमर्याद शक्यता आणि या संकल्पनेच्या मर्यादा नेमक्या दाखवणारा मनुष्यकेंद्री विचार आणि सामाजिक व्यवहार तपस्वी यांनी प्रस्तुत पुस्तकातून कोणत्याही राजकीय विचारसरणीचा आशय न घेता मांडला आहे.''

आयबीएन लोकमत ह्या दूर-चित्रवाणीच्या वृत्तसंपादक ज्ञानदा देशपांडे म्हणाल्या की, मूळचे आयआयटीचे इंजिनीअर व जमनालाल बजाजमध्ये व्यवस्थापनाचे पदव्युत्तर शिक्षण घेतलेले तपस्वी ह्यांचा समाजशास्त्र ह्या विषयाशी काहीही संबंध नसताना त्यांनी हे लेखन केले आहे, हे महत्त्वाचे असले तरी आश्चर्यकारकच म्हणावे लागेल. परंतु, त्यामुळे पारंपरिक समाजशास्त्रीय पुस्तकात येणारे शब्द न वापरता एक संपूर्ण ग्रंथ लिहिला जाऊ शकतो व तोसुद्धा अत्यंत अर्थवाही भाषेतून, हे लक्षात आले. पुस्तक वाचताना तो आनंद मला मिळाला.

'ग्रंथाली'चे धनंजय गांगल यांनी स्वागत केले. लतिका भानुशाली यांनी सूत्रसंचालन केले.

# 'ग्रंथाली' ठाणे केंद्र वाचक दिन

शनिवार, २१ फेब्रुवारी आणि रविवार, २२ फेब्रुवारी २००९ रोजी 'ग्रंथाली'च्या ठाणे केंद्राच्या वतीने वर्तकनगरच्या सावित्रीदेवी थिराणी विद्यामंदिर येथे वाचकदिन आयोजित करण्यात आला होता. वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून 'ग्रंथाली'चे ठाणे केंद्र १९९८ पासून विविध कार्यक्रमांचे आयोजन करते. या वर्षी 'मुलाखत' हे सूत्र घेऊन उपक्रम आयोजित केला गेला होता. ठाण्यातील चोवीस शाळांतील विद्यार्थ्यांनी मुलाखततंत्राचे सादरीकरण केले.

मुलाखत देणारी व्यक्ती विद्यार्थी स्वत: घेऊन आले होते. त्यात शाळेचा शिपाई, भाजीवाला, खेळाडू, उद्योजक, संगणक संस्थाचालक, जादूगार, शिक्षक इत्यादी विविध व्यक्तींच्या मुलाखती विद्यार्थ्यांनी घेतल्या.

'साम मराठी' वाहिनीने या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन त्याचे प्रक्षेपण मराठी दिनाच्या निमित्ताने केले. सर्वच शाळांतील शिक्षक, मुलाखत देणारी व्यक्ती, विद्यार्थी यांनी 'ग्रंथाली'च्या या कार्यक्रमाच्या आयोजना-बद्दल आनंद, अभिमान, समाधान अशा संमिश्र भावनांना व्यक्त केले. महानगर-पालिकेचे विद्यार्थी हे बऱ्याच स्तरावर म्हणजेच सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक या सर्वच पातळीवर इतर विद्यार्थ्यांपेक्षा मागे पडतात. याला अनेक कारणे आहेत. पण या व्यासपीठावर इंग्रजी माध्यमाच्या बरोबरीने महानगरपालिकेतील शाळेतील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास हा वाखाणण्यासारखा होता. मराठी भाषा किंवा मराठी माध्यम या दोहोंचा वापर करून भविष्यात आपले कार्यक्षेत्र निवडू शकतो ही सकारात्मक जाणीव विद्यार्थ्यांना झाली. विविध प्रकारच्या वाहिन्या, त्यासाठी लागणारे मनुष्यबळ, मराठी वाहिन्यांची वाढती संख्या व त्यांना लाभणारा प्रेक्षक वर्ग पाहता भविष्यात या क्षेत्रांत अनेक प्रकारच्या संधी उपलब्ध आहेत व त्यासाठी मराठी भाषेवर प्रभुत्व, वाचन, चौकस बुद्धी, सूक्ष्म निरीक्षण या गोष्टी गरजेच्या आहेत. हा विश्वास या उपक्रमातून निर्माण केला गेला. त्यामुळे मराठी भाषा विषय घेऊन आपण भविष्यात चांगले 'करिअर' घडवू शकतो ही भावना अनेक विद्यार्थ्यांनी साम मराठी टी.व्ही. वर व्यक्त केली.

मुलाखतींसाठी भाजी विकणारा भाजीवाला, शाळेतील शिपाई, यशस्वी उद्योजक, जादूगार, शिक्षक सर्वांना या एकाच व्यासपीठावर एकत्र आणले गेले. या ठिकाणी भाजी विक्रेत्याने अत्यंत हृद्य अनुभव मांडला. ते म्हणाले भाजीने भरलेला ट्रक दारात येऊन उभा होता. त्यावेळीच पंढरपूरच्या वारीला चल, दोन जागा टेंपोत रिकाम्या आहेत, असा मित्राने संदेश पाठवला. पण एवढ्या भाजीच्या विक्रीची जबाबदारी कोणावर टाकणार, असा पेच उभा राहिला. परमेश्वराची हाक ऐकून, भाजी तशीच टाकून पंढरीला गेलो. मग आल्यावर कळले की शेजारच्या एका मुसलमान माणसाने भाजी सडू न देता उत्तम धंदा केला व जमलेले पैसे परत केले. हिंदू-मुसलमान यांच्यातील प्रेमाचे यापेक्षा दुसरे उदाहरण कोणते असणार.

प्राथमिक शाळेतील निवृत्त शिक्षिकेने हिमतीने व्यवसाय सुरू करून सून, मुलगा, पती सर्वांनाच या व्यवसायात कामाला लावले व आज उद्योजिका म्हणून ठाण्यात त्या मान मिळवून आहेत त्याचा अनुभव सांगितला.

शाळेच्या एका शिपाईण बाईंची घेतलेली मुलाखत अनेक अर्थाने वेगळी ठरली. आई-वडिलांनंतर, शिक्षकांच्या बरोबरीने लहान मुलांच्या जडणघडणीत आम्हा शिपायांचा पण मोठा वाटा असतो असे सांगून, त्यांनी रडणाऱ्या शिशू गटातील मुलांना आम्ही शांत करून शाळेची गोडी कशी लावतो याची अनेक उदाहरणे दिली. हीच मुले मोठी झाल्यावर कधी ओळख दाखवतात तेव्हा आनंद होतो. आपले कार्य सफल झाले असे वाटते, अशा भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी थिराणी शाळेचे प्राचार्य श्री. भास्कर चौधरी, श्री. सदारंगानी (ब्रँच मॅनेजर, स्टेट बँक ऑफ इंडिया, वागळे इस्टेट), अविनाश कोरडे (श्री. समर्थ सेवक मंडळाचे माजी अध्यक्ष), श्री. कर्वे (सी.ई.ओ., ठाणे जनता सहकारी बँक), श्री. सराफ (मॅनेजर, सी.के.पी. बँक, ठाणे), प्राचार्य शोभा नार (पीपल्स एज्युकेशन ट्रस्ट), प्रा. लतिका भानुशाली (ग्रंथाली, मुंबई), इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

पुढल्या वर्षीच्या वाचकदिनाचे यजमानपद ठाणे पश्चिम येथील पीपल्स एज्युकेशन ट्रस्ट या शाळेच्या वतीने शाळेच्या प्राचार्य श्रीमती शोभा नायर यांनी स्वीकारले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी 'ग्रंथाली' ठाणे विभागाचे कार्यकर्ते श्री. अविनाश बर्वे, श्री. श्रीधर गांगल, श्रीमती नंदिनी बर्वे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**– प्रतिनिधी**

# तांबडं रक्त – नवा हल्ला

## स्मिता राजे

'युद्धस्य कथा रम्या:' असं एक वचन ऐकलं होतं. पण ह्या कथा खरंच रम्य असतात का हा एक प्रश्नच आहे. भारत-चीन, भारत-पाक युद्धांच्या कथा वाचून कधी अंगावर रोमांच उभे राहतात तर कधी चीड येते. कारण त्यात कुठेतरी आपण मनाने गुंतलेलो असतो, पण रम्यता मात्र कधी वाटली नाही.

इराण युद्ध, इराक युद्ध, ११ सप्टेंबरचा प्रसंग ह्यांच्या हकिगती वाचूनही वाईट वाटलं, पण आत कुठे तुटलं नव्हतं. असंच आणखी एक युद्ध- अफगाण युद्ध! अमेरिका आणि तालिबानी यांच्यामधलं. एकदाचा तो लादेन मिळावा ह्या एका गोष्टीखेरीज त्याच्याशी आपलं काही घेणं-देणं नसणारं. मग हळूहळू ह्या संदर्भात वाचायला मिळाल्या काही कादंबऱ्या- अफगाण डायरी, ब्रेडविनर, परवाना. व्यक्तिनिष्ठ कादंबरीच्या अनुषंगाने झालेले हे अफगाणचे पहिले दर्शन! पण अरुण मोकाशी ह्यांचं 'तांबडं रक्त - नवा हल्ला' हे 'ग्रंथाली'नं प्रसिद्ध केलेलं पुस्तक वाचनात आलं आणि संपूर्ण अफगाणची नव्यानंच ओळख झाली.

मोकाशी हे व्यवसायानं सिव्हिल इंजिनीअर - परिवहन विशेषज्ञ म्हणून त्यांची ख्याती आणि ह्याच संदर्भात त्यांना अफगाणिस्तानला जाण्याचा योग आला आणि सतत दगड-माती-पोलादाच्या रुक्ष आणि क्लिष्ट आकडेमोडीत गुंतलेल्या ह्या रसिक, सहृदय माणसाला आतापर्यंत अपरिचित असलेलं एक नवं जगच समोर आल्यासारखं वाटलं. लहान मुलाच्या अधाशी वृत्तीनं त्यांनी अफगाणचा इतिहास, वर्तमान घडामोडी, त्यांचा परस्परांशी असलेला दृश्य-अदृश्य संबंध सगळं सगळं समजावून घेतलं आणि मग हेच सगळं उतरलं, 'तांबडं रक्त - नवा हल्ला'मध्ये.

असं म्हणतात, शंभर शब्दांचं काम एक चित्र करतं. अशी अनेक बोलकी चित्रं मोकाशींच्या पुस्तकात आहेत. ह्या चित्रांतून युद्धाची भयाणता-अमानुषता-विदारक वास्तव डोळ्यांसमोर येतं. ही चित्रं मोकाशींच्या पुस्तकाचा प्लस पॉइंट. तरी त्यांची अवस्था बहुतेक आपल्या बाळाला किती नटवू-सजवू अशी झालेली दिसते. १८० पानांच्या ह्या पुस्तकात तब्बल १४० चित्रं आहेत. मोकाशींचा दुसरा प्लस पॉइंट म्हणजे त्यांची निवेदनाची पद्धत. प्रत्येक विषय एखादी गोष्ट सांगावी त्याप्रमाणे रंगवून, सोप्या शब्दांत त्यांनी मांडला आहे.

अत्याचाराच्या पहिल्या बळी स्त्रिया आणि अनाथ-पोरकी झालेली मुलं ह्यांचा छळ, कहाण्या आणि चित्रांनी डोळ्यांसमोर येतो. ह्याखेरीजचे विषय- जसे अफूचा चोरटा व्यापार, त्याचे आर्थिक आणि राजकीय परस्पर संबंध, सतत बदलणारे राज्यकर्ते, शिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, यूनोतर्फे होत असलेलं सामाजिक व आर्थिक पुनर्वसन- हे विषय केवळ आकड्यांची टक्केवारी देणं असे न राहता वाचनीय करण्याचं श्रेय लेखकाला दिलंच पाहिजे.

ह्या सगळ्या होरपळीत मोकाशींचे कवी हृदय अफगाण कवितेचा वेध घेतल्याशिवाय पुढे जाऊ शकत नाही आणि ते करतानासुद्धा त्यांची मराठी नाळ तुटत नाही. म्हणूनच त्या कवितांमध्ये त्यांना सुरेश भट, सौमित्र, अनिल आठवत राहतात.

पुस्तकाचा शेवटही मोकाशी ह्यांनी फारच परिणामकारक केला आहे. पुस्तक वाचून वाचकाला पडू शकणाऱ्या सगळ्या संभाव्य प्रश्नांना त्यांनी अचूक हात घातला आहे आणि त्याची वस्तुनिष्ठ उत्तरं तज्ज्ञ लोकांच्या प्रतिक्रियांद्वारे देण्याचा प्रयत्न केला आहे.

मोकाशींचा हा पहिलाच प्रयत्न असला तरी एखाद्या दर्दी लेखकाप्रमाणे त्यांनी विषयाची हाताळणी केली आहे. उत्तरोत्तर त्यांच्याकडून अशीच आशयघन निर्मिती होवो हीच इच्छा.

**स्मिता राजे**
मोबाईल : ९८२१ ५४३ १६६

**'ग्रंथाली' ताजे कवितासंग्रह**



**संशयास्पद टिपणे आणि इतर कविता**
**संजीव खांडेकर**
मूल्य ६० रुपये : सवलतीत ३५ रुपये

**कुणीच कसे बोलत नाही...**
**अशोक कोतवाल**
मूल्य १०० रुपये : सवलतीत ६० रुपये

